POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२३४ ● मुंबई, शनिवार, २८ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुलींची गर्भातच हत्या करून कमवली लाखोंची माया

**कोल्हापूरात एका डॉक्टरने बेकायदेशीर गर्भलिंग निदान केल्याची बातमी समोर आली आहे. ज्यामधून त्याने लाखो रुपये कमावले. या प्रकरणाचा तपास करून पोलिसांनी आरोपीला अटक केली असून आता पुढील तपास सुरू आहे.**



■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

कोल्हापूर जिल्ह्यातील बिद्री इथं बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रकरणाची व्याप्ती वाढत चालली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील डॉक्टर युवराज पाटील याला बेड्या ठोकल्यानंतर सहा एजंटाना देखील अटक केली आहे. सगळ्यात धक्कादायक म्हणजे या डॉक्टराने अनेक भागात एजंटचे जाळ पसरवून मुलीची गर्भातच हत्या केल्याचे समोर आले आहे. इतकंच नाही तर या दुष्यकृत्यातून त्याने लाखो रुपयांची माया जमवली असल्याचे देखील पोलीस तपासात समोर येत आहे.

**इस्पुर्ली पोलिसांकडून प्रकरणाच खोलवर तपास**

दरम्यान, कोल्हापूर जिल्ह्यातील इस्पुर्ली पोलिसांनी बेकायदेशीर गर्भलिंगनिदान प्रकरणाचा छडा लावून यातील प्रमुख आरोपी ड्रॉ. युवराज पाटील याला यापूर्वी जेरबंद केलं. डॉक्टर युवराज पाटील हा बिद्री मधील श्रद्धा हॉस्पिटल मध्ये राजरोस गर्भलिंग निदान करत होता, त्याच बरोबर हजारो रुपये घेऊन याच हॉस्पिटलमध्ये आईच्या पोटातच मुलीची हत्या करत गर्भपात करत होता. इस्पुर्ली पोलिसांनी या प्रकरणाच्या मुळाशी जावून तपासला सुरुवात केल्यानंतर अनेक सहभागी आरोपीची नावे समोर येत आहेत. पोलिसांनी यापूर्वी ड्रॉ. युवराज पाटील आणि संभाजी शिंदे यांना अटक करून लाखो रुपये जप्त केले होते. त्यानंतर आता या प्रकरणाचा तपास करत असताना आणखी सहा जणांचा सहभाग दुष्कृत्यात आढळून आला आहे. पोलिसांनी डॉक्टर युवराज पाटील यांच्यासोबत हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या मनीषा दिनकर कांबळे आणि नंदा ईश्वरा गुरव यांच्यासह बाजीराव तोकडे, विक्रम आनंदा पाटील, सुखदेव पाटील, सुनील सदाशिव गुरव यांना अटक केली आहे.



**गर्भपात केलेल्या भ्रूणांचा तपास सुरू**

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या संपूर्ण रॅकेटमध्ये गर्भपातानंतर भ्रूणाची विल्हेवाट लावण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. डॉ. युवराज पाटील हा गर्भपात केल्यानंतर काही ठराविक महिलांच्या माध्यमातून हे भ्रूण नष्ट करत असल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. या कामासाठी संबंधित महिलांना प्रत्येकी ठराविक रक्कम दिली जात होती. त्यामुळे गर्भपात केलेले भ्रूण नेमके कुठे टाकले गेले किंवा कुठे पुरले गेले याचा शोध पोलिसांनी आता सुरू केला आहे.

**आरोपीवर गर्भपात केल्या प्रकरणी अधिकचा गुन्हा दाखल**

या सर्व एजंटच्या चौकशीत अनेक धक्कादायक माहिती समोर येत आहेत. पोलिसांना एजंटांच्या मोबाईल मधील अनेकांची नावे समोर आली आहे. यामध्ये प्रामुख्याने एजंटनी कोणा मार्फत गर्भलिंग निदान करण्यासाठी डॉक्टर युवराज पाटील यांच्याकडे पेशंट आणले, त्यांच्याकडून किती रुपये मिळाले याची सर्व माहिती असणारे डिजिटल फोटो उपलब्ध झाले आहेत. पोलिसांनी आतापर्यंत डॉक्टर युवराज पाटील याच्यावर गर्भलिंग निदान केल्याचा गुन्हा दाखल केला होता, पण आता नव्याने बेकायदेशीर गर्भपात केल्या प्रकरणी अधिकचा गुन्हा दाखल होणार आहे.

## राज्यात ३०-३१ मार्चला वादळी पावसाची शक्यता

### काढणी केलेली पिके सुरक्षित ठेवण्याचे कृषी विभागाचे आवाहन

■**मुंबई। प्रतिनिधी,**

सध्या राज्यातील काही भागात अंशतः आभाळी हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर काही ठिकाणी वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक आणि तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. तर राज्यातील काही भागांमध्ये ३० मार्च दरम्यान प्रामुख्याने दुपारनंतर ढगाळ हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. उर्वरित विदर्भात देखील हवामानात बदल दिसू शकतो. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता नाकारता येत नाही. ३१ मार्च रोजी देखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे आणि त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## पुन्हा रॉकेल मिळू लागणार...

### प्रति कुटुंब ३ लिटर केरोसिन



■**मुंबई। प्रतिनिधी,**

एलपीजीच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने केरोसिन (रॉकेल) वितरणाबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला असून त्यानुसार प्रति कुटुंब ३ लिटर केरोसीन वितरीत केले जाणार आहे. केंद्र सरकारकडून राज्याला ३ हजार ७४४ किलोलिटर (सुमारे ३७.४४ लाख लिटर) केरोसिन मंजूर करण्यात आले असून त्याचे तात्पुरत्या स्वरूपात वितरण करण्यात येणार आहे. विभागाच्या निर्णयानुसार केरोसिन वितरणात अंत्योदय आणि पीएचएच गटातील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच शुभ्र तसेच शिधापत्रिका नसलेले कुटुंब आणि स्थलांतरित मजूर यांनाही उपलब्धतेनुसार केरोसिन दिले जाणार आहे. राज्यभरात लवकरच केरोसिन वितरण सुरू होणार असून, वाटपाच्या तारखेपासून ४५ दिवसांत संपूर्ण उचल पूर्ण करणे बंधनकारक असेल. न उचललेला साठा पुढे नेण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. केरोसिन वितरणासाठी तेल कंपन्या,जिल्हाधिकारी आणि रास्त भाव दुकानदार यांच्यामार्फत स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. तसेच केरोसिनचा गैरवापर टाळण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष निरीक्षण पथके नियुक्त करण्यात येणार असून, अनधिकृत विक्री आढळल्यास कठोर कारवाई केली जाणार आहे.

## भारतात देशव्यापी लॉकडाउन लागू होणार का?

### पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांसोबत घेतलेल्या बैठकीत नेमकं काय ठरलं?

**गेल्या 11 वर्षात केलेले प्रयत्न भर घालणारे**

ऊर्जा स्त्रोतांचे विकेंद्रीकरण. आधी 27 देशातून, आता 41 देशातून आयात होते. त्यामुळे त्या स्थितीत जे संकट आले असते, ते आता आलेले नाही. ई-बसेस, सोलर ऊजेर्सांठी घेतलेला पुढाकार यामुळे सुद्धा ऊर्जा स्त्रोतांचे विकेंद्रीकरण झाले. एलपीजी पुरवठा सामान्य सुरू आहे. आत्मनिर्भरता अभियानाचे निश्चित फायदे झाले आहेत.

**खतांची पुरेश उपलब्धता**

खतांची पुरेशी उपलब्धता आहे. राज्यात सुद्धा त्याचा वेळोवेळी आढावा घेतला जातो आहे. शेतकऱ्यांना खरीप हंगामात कोणतीही अडचण येणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. जे लोक काळाबाजारी, साठेबाजी यात गुंतले आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जात आहे. शेतीशी संबंधित बाबी आम्ही अग्रिस्टॅकशी जोडतो आहोत. त्यामुळे कुणाला काळाबाजारी करता येणार नाही. सातत्याने बैठका घेऊन संपूर्ण परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

**पीएनजीसाठी गती देण्याचं काम**



दरम्यान, पीएनजीसाठी संपूर्ण गती देण्यात आली असून यासाठी 'इज ऑफ डुईंग बिझिनेस'चा अवलंब केला जात आहे. टाईमलाईनचे पालन केले जाते आहे. ज्या काही सूचना केंद्र सरकारकडून येतील, त्याचे संपूर्ण पालन महाराष्ट्र सरकार करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीसांनी या बैठकीत म्हटले.

■**पुणे। प्रतिनिधी,**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत लॉकडाऊनच्या अफवांवर त्यांनी भाष्य केले. देशव्यापी लॉकडाऊन होणार नसल्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत लॉकडाऊनच्या अफवांवर त्यांनी भाष्य केले. देशव्यापी लॉकडाऊन होणार नसल्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले. मुख्यमंत्र्यांना 'टीम इंडिया' म्हणून काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले. 'टीम इंडिया' म्हणून एकत्र काम केल्यास देश या परिस्थितीतून यशस्वीपणे



बाहेर पडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आर्थिक आणि व्यापारी स्थिरता राखणे, ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करणे, नागरिकांच्या हिताचे रक्षण करणे आणि पुरवठा साखळी व उद्योग मजबूत करणे ही सरकारची प्राथमिकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पुरवठा साखळीचे कामकाज सुरळीत चालेल याची खात्री करण्याचे आणि साठेबाजी व नफेखोरीविरोधात कठोर कारवाई

**पंतप्रधानांसमवेतच्या या बैठकीला 15 राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित**

पंतप्रधानांसमवेतच्या या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय मंत्रिमंडळ सचिव, आणि विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्र शासित प्रदेशांचे नायब राज्यपाल आणि 15 राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. त्यामध्ये, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्यावतीने भूमिका मांडली. या कठीण प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे नेतृत्व प्रदान केले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

करण्याचे आवाहन त्यांनी राज्यांना केले.

**पंतप्रधान मोदींनी आगाऊ नियोजनावर भर दिला**

पंतप्रधान मोदींनी कृषी क्षेत्रात, विशेषतः खतांच्या साठवणूक आणि वितरणाच्या देखरेखीसंदर्भात, आगाऊ नियोजनाच्या गरजेवर भर दिला. वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सर्व स्तरांवर मजबूत समन्वयाची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. सीमावर्ती आणि किनारपट्टीवरील राज्यांकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले, जेणेकरून जहाजवाहतूक, अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा आणि सागरी कार्यांशी संबंधित कोणतेही प्रश्न जलद आणि सहजपणे सोडवता येतील असे ते म्हणाले.

**अफवा पसरवणाऱ्यांना इशारा**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्व मुख्यमंत्र्यांना गैरमाहिती आणि अफवा पसरवण्याविरोधात इशारा दिला आहे. अचूक, विश्वसनीय माहिती प्रसारित करण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने परिस्थिती हाताळण्यासाठी उचललेल्या पावलांचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर इंधनावरील उत्पादन शुल्क कमी करण्याच्या आणि राज्यांना व्यावसायिक एलपीजी वाटप वाढवण्याच्या निर्णयांचेही त्यांनी स्वागत केले. आपल्या राज्यांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी गॅस पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून परिस्थिती स्थिर असल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. परिस्थिती प्रभावीपणे हाताळण्यासाठी केंद्रासोबत समन्वय साधून काम करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा सर्वांनी पुनरुच्चार केला.

## 'मी शंकर, तू माझी पार्वती' सांगत धर्मगुरुचा महिलेवर अत्याचार

### अशोक खरात प्रकरणाची पुनरावृत्ती!

■**वसई। प्रतिनिधी,**

संपूर्ण महाराष्ट्रात सध्या अशोक खरात प्रकरणानं खळबळ माजलेली असतानाच आता असंच आणखी एक प्रकरण समोर आलं आहे. खरातप्रकरणी नवनवीन आणि तितकेच हादरवणारे खुलासे तपासातून समोर येत आहेत. याचदरम्यान आणखी एका धर्मगुरूच्या दुष्कृत्यांना वाचा फुटली आहे.

**'मी शंकर आहे असून तू माझी पार्वती'**

'मी शंकर आहे असून तू माझी



पार्वती आहेस, असं सांगून एका महिलेवर बलात्कार करणाऱ्या वसईतील स्वयंघोषित धर्मगुरूचा नुकताच पदार्फाश झाला आहे. ऋषिकेष वैद्य असं त्याचं नाव असून, याच्याविरोधात वसईच्या माणिकपूर पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे. पुढील कारवाईसाठी हे प्रकरण पुण्यातील हडपसर पोलिसांकडे वर्ग करण्यात आले आहे.

दरम्यान खरातप्रमाणंच या कथित धर्मगुरूनं अनेक मुलींची फसवणूक केल्याची माहिती आहे. ऋषिकेश वैद्य यानं आपण धर्मगुरू असल्याचं भासवून अनेक मुलींना आपल्या जाळ्यात ओढून त्यांचं लैंगिक शोषण केल्याचं पीडित महिलेनंच पोलिसांना दिलेल्या माहितीत सांगितलं.

**35 वर्षांच्या महिलेवर अत्याचार**

उपलब्ध माहितीनुसार पीडित महिला 35 वर्षांची असून पुण्यात राहते. तिने माणिकपूर पोलिसांना दिलेल्या फियार्दीनुसार 2023 मध्ये तिची ओळख या व्यक्तिशी झाली होती. वसईतील स्वयंघोषित धर्मगुरू आणि आमची वसई या संस्थेचा प्रमुख ऋषिकेश वैद्य याच्याशी फेसबुकवरुन तिची ओळख झाली. त्याने पीडित महिलेच्या धार्मिक वृत्तीचा फायदा घेत अध्यात्म शिकविण्याच्या बहाण्याने जवळीक साधली. डिसेंबर 2023 मध्ये तो तिला भेटण्यासाठी पुण्यात गेला. तिथं, 'मी महादेवाचा अवतार आहे. तू माझी पार्वती आहेस' असे सांगून त्यानं तिला भुलवलं. यानंतर तिला पुण्यातील मांजरी इथं एका लॉजमध्ये नेलं तिला गुंगीचं औषध देऊन तिच्यावर अत्याचार केला. या काळात वैद्य याने तिच्या नकळत तिची अश्लील छायाचित्रंही काढली होती. अश्लील छायाचित्रांच्याच माध्यमातून तो तिला ब्लॅकमेल करु लागला, फोटोंच्या माध्यमातून तो तिला पुन्हा भेटायला बोलावत होता. मे 2025 मध्ये वसईतील हॉटेल एक्सप्रेस इन मध्ये पीडित महिलेला भेटायला बोलावून त्यानं तिच्यावर पुन्हा अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. सध्या राज्यात नाशिकच्या अशोक खरात प्रकरणाचं बिंग फुटल्याचं पाहून पीडितेनं धाडस दाखवत पतीला हा प्रकार सांगितला. ज्यानंतर बुधवार 25 मार्च रोजी वसईच्या माणिकपूर पोलीस तक्रार दाखल केली. ऋषिकेश वैद्य याच्या विरोधात ही तक्रार दाखल केली. बलात्काराची पहिली घटना पुण्यात घडली असल्यानं हे प्रकरण हडपसर पोलीस ठाण्यात वर्ग केल्याची माहिती माणिकपूर पोलिसांनी दिली.

## चोरीच्या संशयातून बापाने पोटच्या मुलींना रात्रभर उलटे टांगले

### पाणी, पाणी म्हणून ओरडत राहिल्या... एकीचा तडफडून मृत्यू



■**सांगली। प्रतिनिधी,**

सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील बनपुरी येथे माणुसकीला काळिमा फासणारी आणि अंगावर शहारे आणणारी घटना उघडकीस आली आहे. केवळ चोरीच्या संशयावरून दोन निष्पाप मुलींना रात्रभर उलटे टांगून त्यांचा अमानुष छळ झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारानंतर दहा वर्षीय सानिकाचा मृत्यू झाला असून तिची 11 वर्षीय बहीण अनुजा देखील गंभीर जखमी झाली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

**हात-पाय बांधून पत्र्याच्या अँगलला उलटे टांगले**

याबाबत अधिक माहिती अशी की, बनपुरी येथील मुलींवर शेजाऱ्यांनी चोरीचा संशय घेतल्याने नाना हैबत यमगर या निर्दयी बापाने काल बुधवारी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास सानिका आणि अनुजा या दोन्ही मुलींना हात-पाय बांधून घरातील पत्र्याच्या अँगलला उलटे टांगले. यानंतर या निष्पाप मुली वेदनेने रात्रभर तडफडत 'पाणी, पाणी' म्हणून ओरडत राहिल्या. मात्र, आई-वडिलांनी त्यांना पाण्याचा थेंबही दिला नाही. तर मुलींना टांगणारे निष्ठुर आई-वडील निर्धास्तपणे झोपी गेले.

**'असा' उघडकीस आला प्रकार**

मात्र, जखमी अनुजाने शुद्धीवर आल्यानंतर आम्हाला वडिलांनी हात-पाय बांधून टांगले आणि मारहाण केली असे सांगितल्याने हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. या संपूर्ण प्रकारानंतर मोठी खळबळ उडाली असून सध्या पोलिसांकडून घटनेचा सखोल तपास सुरू आहे. घटनेनंतर आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुलींना सोडणाऱ्या आजोबांवरच मुलीच्या वडिलांनी कोयत्याने हल्ला करत त्यांना धमकावले होते. यामुळे कुटुंबातील अंतर्गत वाद आणि क्रौयार्ची परिसीमा स्पष्ट होत आहे. ही घटना केवळ एक गुन्हा नसून माणुसकीचा झालेला क्रूर खून असल्याची भावना व्यक्त होत आहे. दोन निष्पाप जीवांवर एवढा अमानुष अत्याचार करणाऱ्या आरोपींविरोधात कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

**गुपचूप उरकला अंत्यसंस्कार**

यानंतर आज गुरुवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मुलीच्या आजोबांनी मुलींना खाली सोडवले, मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता. सानिका ही मृतावस्थेत आढळली, तर अनुजा बेशुद्ध अवस्थेत होती. यांनतर अनुजाला जखमी अवस्थेत तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर मृत सानिकाला दुसऱ्या खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र सानिका मृत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, ही घटना बाहेर येऊ नये म्हणून संबंधित कुटुंबीयांनी मयत सानिकेचा अंत्यसंस्कार गुपचूप करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

**मध्यरात्री घरी जाऊन केसच कापले**

हा राग अखेर 25 मार्च 2026 रोजी मध्यरात्री टोकाला पोहोचला. साडेबाराच्या सुमारास मुख्य आरोपी तरुणी आपल्या दोन मैत्रिणींसह पीडितेच्या वसोर्वा येथील घरी पोहोचली. आईस्क्रीमची डिलिव्हरी आली असावी या समजुतीने पीडितेने दरवाजा उघडताच, आरोपी तरुणीने तिला घराबाहेर ओढून जबरदस्तीने तिचे केस कापण्यास सुरुवात केली. यावेळी तिच्या सोबत आलेल्या मैत्रिणींनी या संपूर्ण प्रकाराचा व्हिडीओ आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केला. केस कापल्यानंतर 'हेअर नो हेअर' म्हणत आरोपीने पीडितेची थट्टा केली आणि कापलेले काही केस सोबत घेऊन तिथून पळ काढला.

## प्रियकराने प्रेयसीसमोर केलं मैत्रिणीच्या केसांचं कौतुक, प्रेयसी घरात घुसली अन्...

■**डोंबिवली। प्रतिनिधी,**

सौंदर्याच्या मत्सरातून एक धक्कादायक घटना घडली आहे. प्रियकराने प्रेयसीसमोर दुसऱ्या तरुणीच्या केसांची स्तुती केल्याने प्रेयसी भलतीच रागावली. यानंतर तिने थेट तरुणीच्या घरी जाऊन तिचे केस कापले आणि व्हिडिओदेखील बनवला. मुंबईतील वसोर्वा परिसरातील ही घटना आहे. या प्रकरणी पीडित तरुणीने थेट वसोर्वा पोलिस स्टेशनमध्ये धाव घेतली. यानंतर पोलिसांनी मुख्य आरोपीसह तिला मदत करणाऱ्या तीन




मैत्रिणींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**प्रेयसीसमोर केले केसांचे कौतुक**

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीची ओळख आरोपी तरुणी आणि तिच्या प्रियकराशी झाली होती. आरोपीचा प्रियकर इन्स्टाग्रामच्या माध्यमातून पीडितेशी संवाद साधत असे. या संवादादरम्यान त्याने पीडितेच्या केसांचे कौतुक आपल्या प्रेयसीसमोर केले, तसेच तिला भेटायला जाणार असल्याचेही सांगितले. यामुळे प्रेयसीच्या मनात संशयाची पाल चुकचुकली आणि तिने 7 मार्च रोजी पीडितेचे घर गाठून तिचा मोबाईलही तपासला होता; मात्र तेव्हा तिला काहीही आक्षेपार्ह आढळले नव्हते. तरीही प्रियकराच्या त्या कौतुकाचा राग तिच्या मनात धुमसत होता.

**वृद्ध वडिलांनी मुलीच्या लग्नासाठी भोंदू बाबाचा मार्ग निवडला**

घडलेल्या घटनेनुसार, मुलीच्या लग्नात अडथळा निर्माण होत असल्याने वृद्ध वडिलांनी मुलीच्या लग्नासाठी उपाय म्हणून भोंदू बाबाचा मार्ग निवडला, पण त्यामुळे अडचण निर्माण झाली. भोंदूने विधी करून दोष दूर करण्याचे आमिष दाखवले. नंतर विधीच्या नावाखाली त्याने पीडितांकडून सोन्याचे ब्रेसलेट आणि चांदीची लक्ष्मी नाणी घेतली होती.



## डोंबिवलीत लेकीचं लग्न जुळत नव्हतं म्हणून बापानं भोंदू बाबाला गाठलं, दोष दूर करण्याच्या नावाखाली भलतंच कांड...

■**डोंबिवली। प्रतिनिधी,**

डोंबिवलीत अंधश्रद्धेच्या नावाखाली फसवणुकीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मुलीच्या लग्नातील कथित 'दोष' दूर करण्याच्या बहाण्याने भोंदू बाबाने वयोवृद्ध व्यक्तीची फसवणूक केल्याची माहिती समोर आल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी विष्णूनगर पोलिसांनी दीपक सावंत या आरोपीला कल्याण येथून अटक केल्याचे वृत्त आहे. भोंदू महाराज अशोक खरात यांच्या प्रकरणानंतर राज्यात अशा घटना उघडकीस येऊ लागल्या आहेत.

**विधीदरम्यान आरोपीने दागिन्यांच्या रुमालाचा केला खेळ**

विधीदरम्यान आरोपीने हे दागिने लाल रंगाच्या रुमालात ठेवण्यास सांगितले आणि चालाखीने रुमालाची अदलाबदल केली होती. नंतर दुसरा रुमाल पीडितांच्या हातात देऊन त्याने घटनास्थळावरून पळ काढला. काही वेळानंतर फसवणूक केल्याचं लक्षात येताच, पीडितांनी विष्णू नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्याची माहिती समोर आली.

तक्रारीनंतर पोलिसांनी तात्काळपणे तपास सुरु करून दीपक सावंतला कल्याण परिसरात अटक करण्यात आली. आरोपीने याआधी देखील अशा प्रकारे अनेकांना फसवल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे, संबंधित प्रकरणात पोलिसांकडून पुढील तपास सुरु करण्यात आला आहे. दरम्यान, अशा भोंदू बाबांच्या जाळ्यात अडकू नये, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केल्याची माहिती आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# ‘धुरंधर’चे राष्ट्रकार्य चालूच!

‘धुरंधर : द रिव्हेंज’ हा चित्रपट १९ मार्च, म्हणजे गुढीपाडव्याला प्रदर्शित झाला. या चित्रपटाला भारतासह जगभरात पुष्कळ प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटाचे आगाऊ आरक्षणही अनेक दिवसांपूर्वीच संपले होते. यापूर्वी ‘धुरंधर’ हा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर त्याला जगभरातून डोक्यावर घेतले गेले आणि अनेक विक्रमांची नोंद करत चित्रपटाने पुष्कळ कमाई केली. या चित्रपटातील मुख्य सूत्र, म्हणजे भारताच्या गुप्तचर यंत्रणेने पाकमध्ये शिरून उद्ध्वस्त केलेले आतंकवादी आणि त्यांची यंत्रणा! पाकमध्ये भारतीय एजंटांनी शिरून मुख्य आतंकवाद्यांसमवेत त्यांचे समर्थक, तर कधी सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत राहून कट रचून एक एक करून त्यांना संपवण्याच्या कामगिरीचे प्रातिनिधिक चित्रीकरण ‘धुरंधर’ या चित्रपटांच्या मालिकेत आहे. आता २ दिवसांपूर्वीच पाकमधील मुदिरके येथील मरकज तयबा या लष्कर-ए-तोयबाच्या मुख्यालयातून नमाजपठण करून बाहेर आलेला लष्कर-ए-तोयबाचा कमांडर बिलाल अरीफ सलाफी याला अज्ञात बंदूकधार्याने गोळ्या घालून ठार केले. या घटनेच्या १-२ दिवस आधीच भारतासह जगभरात ‘धुरंधर : द रिव्हेंज’ हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि त्याला सलामी देत अज्ञाताने आणखी एका आतंकवाद्याला अल्लाकडे पाठवले. पाकमध्ये अज्ञात बंदूकधाऱ्याकडून तेथील महत्त्वाच्या आणि त्यातही भारतावर आतंकवादी आक्रमणे करणाऱ्या आतंकवाद्यांना ठार करण्याच्या घटना गत ४ वर्षांपासून घडत आहेत. हे अज्ञात बंदूकधारी कोण आहेत? याचा थांगपत्ता अद्याप पाक सरकार, गुप्तचर यंत्रणा आणि सैन्य यांनाही लागलेला नाही. अज्ञात बंदूकधाऱ्याने पाकमध्ये ‘मुजाहिदां’ना, म्हणजे आतंकवाद्यांना ठार करण्याच्या घटना वर्ष २०१० मध्ये अत्यंत तुरळक प्रमाणात होत होत्या; मात्र गत ४ वर्षांमध्ये यांचे प्रमाण वाढले आहे. काही दिवस ते काही महिने या अंतराने आतंकवाद्यांना एकटे गाठून ठार केले जात आहे. आतंकवाद्यांचा कारखाना असलेल्या पाकमध्ये एखाद-दुसरा आतंकवादी मारला गेल्याची विशेष चर्चा सोडाच, त्याची नोंदही प्रारंभी घेतलेली नव्हती. जेव्हा आतंकवाद्यांच्या म्होरक्यांच्या, कमांडरच्या हत्या होऊ लागल्या आणि त्याचा काही मागमूस लागेना, तेव्हा कुठे आता पाक सरकार ‘भारत या हत्या घडवून आणत आहे’, असा आरोप करत आहे. स्वतः एक तर आतंकवादी निर्माण करायचे, त्यांना भारतात आक्रमण करण्यास पाठवायचे आणि त्यांच्या हत्या झाल्यावर शोध घेण्यास आलेले अपयश झाकण्यासाठी भारताकडे बोट दाखवायचे. ज्या पाकने सरकारी धोरणाचा भाग म्हणून भारताविरुद्ध आतंकवादी यंत्रणा राबवली, त्यांच्यासाठी प्रशिक्षण केंद्रे निर्माण केली, त्यांना अत्याधुनिक शस्त्रांनी सुसज्ज केले, भारतात घुसवून सहस्रो निष्पाप भारतियांच्या हत्या केल्या, आतंकवाद्यांच्या कुटुंबियांसाठी पैशांची व्यवस्था केली, आतंकवादी मारला गेल्यास त्याच्या जनाजाला सलामी देण्यासाठी सैन्याधिकाऱ्यांना पाठवले, त्या पाकला भारतावर आरोप करण्याचा अधिकार आहे का? देशात झालेल्या आतंकवादी आक्रमणांचे अनेक पुरावे वेळच्या वेळी भारताने पाकला दिले आहेत. त्या सर्व पुराव्यांना पाकने केराची टोपली दाखवली आहे. आतंकवाद्यांवर कारवाई तर सोडाच; पण त्यांना सुरक्षित ठिकाणी लपण्यास जागा दिली आहे. त्यामुळे आतंकवादी न्यून कसे होतील? त्यांची संख्या वाढतच रहाणार! अधिकाधिक मुसलमान तरुणांना भारताविरुद्ध भडकावून आणि खोटी माहिती सांगून ‘जिहाद’ करण्यास प्रवृत्त करण्यात येते. या जिहादी प्रवृत्तीला उत्तर एकच होते, ते म्हणजे इस्रायलप्रमाणे कारवाई करणे! त्यात दोन्ही अण्वस्त्रसज्ज देश, त्यामुळे भारत-पाक यांच्यात तणाव निर्माण झाला, म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर महासत्तांना कळवळा की, युद्ध होऊ नये, बोलणी करावी म्हणे! म्हणजे महासत्ता किंवा विकसित देश म्हणवून घेणाऱ्यांविरुद्ध काही घटना घडल्यास ते थेट आक्रमणच करणार आणि भारताने मात्र संयम बाळगण्याची अपेक्षा! वर्ष २०१४ पूर्वी तर नेभळट, षंढ आणि आंतरराष्ट्रीय दबावापुढे झुकणारे काँग्रेसचे सरकार होते. त्यामुळे आतंकवाद्यांवर कारवाईची तसूभरही शक्यता नव्हती. तेव्हा भारताने मार खाणे आणि भारतियांनी मुकाटपणे आतंकवादी घटना पहात रहाणे, मरणारे भारतीय अन् सैनिक यांची संख्या मोजून त्यांना श्रद्धांजली वहाणे एवढेच ठाऊक होते. नंतर काळ पालटला आणि भारताने मोठ्या आतंकवादी आक्रमणानंतर ‘सर्जिकल स्ट्राईक’, म्हणजे प्रत्युत्तर देणे चालू केले. यापूर्वी भारतियांनी भारतावरील आतंकवादी आक्रमणाचे एवढ्या जोरकस प्रत्युत्तर दिलेले कधी अनुभवलेही नव्हते. आताचा काळ भारतासाठी अधिक अनुकूल म्हणावा लागेल; कारण आता थेट शत्रूदेशाच्या भूमीवर जाऊन आतंकवाद्यांना ‘ठोकण्यास’ प्रारंभ झाला आहे. भारत सरकारने कधीही उघडपणे याविषयी सांगितलेले नाही किंवा पाककडून भारतानेच केले, असेही स्पष्ट सांगितलेले नाही. भारताच्या ‘हिट लिस्ट’वर (‘लक्ष्य सूची’वर) असलेले आतंकवादी मारले जात आहेत. शत्रूदेश पाकमध्ये जेथे अखंड अस्थिर, अशांत वातावरण आहे, कुठे ना कुठे बाँबस्फोट होत असतात, एकापेक्षा एक अत्यंत क्रूर आतंकवादी रहातात, आय.एस.आय.सारखी घातक गुप्तहेर संघटना आहे, गुन्हे विश्वातील सर्वच कुख्यात लोकांचा जो देश आश्रयस्थान आहे, तेथे गोपनीयरित्या प्रवेश करणे, त्या आतंकवाद्यांसह राहून सर्व व्यवस्था अभ्यासणे, त्यांच्या यंत्रणेचे निरीक्षण करणे आणि योग्य संधीची वाट पाहून आतंकवाद्याला ठार करून कोणताही पुरावा मागे न सोडणे, हे अंगात प्रखर भारतप्रेम असलेली व्यक्तीच करू शकते. ‘धुरंधर’ हा चित्रपट या सर्व अत्यंत कठीण आणि अशक्य वाटणाऱ्या गोष्टी ‘अज्ञाता’ने कशा प्रकारे साध्य केल्या असतील? याची काही घंट्यांमध्ये तोंडओळख करून देतो. देशासाठी शत्रूदेशाच्या भूमीवर आतंकवाद्यांच्या गोटात जाऊन उत्पात करणे, आतंकवाद्यांमध्ये भीती निर्माण करणे, त्यांची यंत्रणाच हादरवून सोडणे हे सर्व स्वप्नवत् वाटत असले, तरी ते ‘अज्ञात धुरंधर’ने साध्य केलेले आहे. भारतात रक्ताचे पाट वहाण्यासाठी कारणीभूत आतंकवादी एकामागोमाग दफन होत आहेत, हे पहातांना अज्ञाताविषयी अभिमान वाटतो आणि भारतमातेचा जयघोष करावासा वाटतो. ‘धुरंधर’ या पहिल्या चित्रपटात ‘हिंदू घाबरट जमात आहे’, या आतंकवाद्याच्या विधानाला ‘वेळ आल्यावर हिंदु नृसिंह बनून सावजाला सहज नष्ट करतो’, असे उत्तर दुसऱ्या ‘धुरंधर : द रिव्हेंज’ या चित्रपटातून दिले आहे. दाऊद इब्राहीम, हाफीज महंमद सईद, मौलाना मसूद अझहर इत्यादी काही महत्त्वाचे आतंकवादी अद्यापही पाकचा पाहुणचार झोडत आहेत, तर काही खलिस्तानी आतंकवादी कॅनडा आणि अमेरिका यांचा आश्रय घेतल्यामुळे अद्याप जिवंत आहेत. मुळातच आतंकवाद्यांचा कारखाना असलेला पाकिस्तान जोपर्यंत नष्ट केला जात नाही, तोपर्यंत भारताचा धोका न्यून होणार नाही. असे असले, तरी ‘अज्ञात धुरंधर’ने आतापर्यंत गाजवलेल्या शौर्याला तोड नाही!

# मराठी शाळा व संस्कृती वाचवणार कोण?

काही वर्षांपूर्वीची गोष्ट, मुंबईतील मराठमोळ्या ग्रँट रोड परिसरात राहणारे माझे मित्र किस्सा सांगत होते. मराठी भाषेचा अभिमान म्हणून त्यांनी त्यांच्या मुलीला ग्रँट रोड येथील एका नामांकित मराठी शाळेत प्रवेश घेतला. काही वर्षे गेल्यानंतर अचानक एक दिवस त्या शाळा व्यवस्थापनाने मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला व तसे पालकांना कळवले. माझे मित्र धडाडीचे कार्यकर्ते होते. ग्रँट रोड सारख्या मराठमोळ्या विभागातील नामांकित मराठी शाळा बंद पडते म्हणून त्यांनी थेट तेथील कार्यकर्त्यांना हाताशी धरले व शाळा व्यवस्थापनाला जाब विचारण्यासाठी शाळेत पोहोचले. प्रथम वादावादी झाल्यानंतर शाळा व्यवस्थापनाने नमती भूमिका घेतली व सुचवले की आम्ही मराठी शाळा सुरू ठेवण्यास तयार आहोत,फक्त तुमची जबाबदारी विद्यार्थी आणून देण्याची राहील, ते झाले तरच आम्ही शाळा सुरू करू शकतो, हे सांगताच सर्वच विषयावर पडदा टाकावा लागला. कारण त्यावर ना पालकांकडे उत्तर होते ना शाळा व्यवस्थापकांकडे. या सवाला जबाबदार होती ती पालकांची द्विधा मानसिकता. असो. विषय असा, की मराठी शाळा असो किंवा मराठी संस्कृती असो ती टिकवायची कोणी त्याचे खापर प्रशासनावर फोडायचे, की त्याची सर्वस्वी जबाबदारी आपण जनतेने घ्यावी का? याला नेमके जबाबदार कोण? घरात मराठी हवी मात्र बाहेर पडल्यावर हिंदी अथवा इंग्रजीतच बोलावे ही सध्याची मानसिकता. मग आपण प्रशासनाकडे का बोट दाखवायचे. त्यातही आपल्या आजूबाजूला मराठीसाठी व मराठी संस्कृती टिकण्यासाठी झटणारे बरेच असतात त्यातलंच एक मराठी अभ्यास केंद्र. आजच विषय का काढावा लागला कारण मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार, अभिनेत्री आणि मराठी शाळांच्या सदिच्छादूत चिन्मयी सुमीत हे मराठी अभ्यास केंद्राचे कार्यकर्ते. यांनी नुकतीच पालिका आयुक्तांची भेट घेतली. कारण होते मराठी शाळा बंद पडण्याच्या विषयावर मुंबई महापालिका आयुक्तांची भूमिका काय? विषयाला चांगली सुरुवात झाली असताना मात्र आयुक्तांनी घुमजाव केले असा या मराठी अभ्यास केंद्राचा आरोप आहे. पालिकेच्या सहा शाळांचा खासगीकरणाचा मुद्दा यावेळी मांडण्यात आला. त्यात पालिकेच्या शाळा फक्त सीबीएससी व आयसीएससी का? यामुळे प्रादेशिक माध्यमांच्या शाळा बंद पडतील असा धोकाही व्यक्त करण्यात आला. यावर पालिका आयुक्त गगराणी यांच्या मते या सहा शाळांचा विषय म्हणजे शाळांचे खासगीकरण नाही तर भूखंडाचे खासगीकरण आहे. या चुकीच्या बातम्या असल्याचा त्यांनी




मराठी शाळा टिकण्यासाठी आता हवी फक्त पालकांची इच्छाशक्ती व मानसिकतेत होणारा बदल आता मराठी शाळा टिकवू शकतात असं आयुक्तांनी स्पष्ट केलं आहे.

उल्लेख केला. त्याबाबतचे सादरीकरण त्यांच्या माध्यमातून केले गेले. पालिकेकडे पडलेले भूखंड चटईक्षेत्र निदेर्शानुसार बदल्यात जे उपलब्ध होतात तो हा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपण मराठी शाळांचा आग्रह धरू नये का? असा प्रश्न विचारला तेव्हा गगराणी यांनी हा आग्रह आम्हाला धरायचा नाही असे स्पष्ट म्हटले व हा धोरणात्मक निर्णय असल्याचे सांगितले.

गगराणी यांनी मुंबईतील कुठलीही इमारत जीर्ण व धोकादायक झाली असल्यास त्याच काय करायचं हे महापालिकेचे धोरण आहे असे म्हटले. परंतु, शाळांची इमारत वर्षानुवर्षे पूर्ण होत नाही ही वस्तुस्थिती आयुक्तांना पटली. पाडकाम करणाऱ्या शाळांच्या बाबतीत पालकांना विश्वासात घेतले जात नाही अशी भूमिका मांडली गेली असता गगराणी यांनी ही भूमिका बरोबर असल्याचे मान्य करत पालकांसोबत चर्चा करण्याचे निर्देश दिले. सगळी मुलं विस्थापित झाल्यानंतर महापालिकेने कारवाई करायला सुरुवात केली. दीड वर्षे मुलांची फरपट झाली ही भूमिका स्पष्टपणे मांडली. गगराणी यांनी समन्वयाचा अभाव असल्याबाबत मान्य केले. यानंतर समन्वयाचा अभाव राहणार नाही त्याबाबत काळजी घेण्याच्या सूचना दिल्या.

मुंबई पब्लिक स्कूलचा जो प्रयोग मुंबई महानगरपालिका करत आहे तो थांबवण्याबाबत महानगरपालिकेने पुढाकार घ्यायला हवा. सीबीएससी किंवा इतर मंडळाच्या ज्या शाळा आहेत त्या मराठी माध्यमाच्या सुरू करण्याबाबत याबाबत भूमिका मांडली व त्या काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा याबाबत चर्चा झाली. मराठी भाषा संवर्धन समिती स्थापन करण्याबाबत भूमिका मांडली गेली. अंगणवाड्यांसोबत जोडून घेऊन मराठी अभ्यास केंद्राला काम करता येईल का, याबाबत विचारणा करण्यात आली व प्रस्ताव ठेवण्यात आला. मुंबई महानगरपालिका मराठीसाठी जे काही काम करते त्याचे सादरीकरण करण्यात आले. त्याचं असं म्हणणं होतं की मुंबई महानगरपालिका मराठी शाळांसाठी काहीच करत नाही, असं जे चित्र उभं केलं आहे ते चुकीचं आहे. पालिका मराठीसाठी काय काय करतं याची जंत्रीच पालिका आयुक्तांनी मांडली. तर मुंबई महानगरपालिका परिपत्रक आदेश मराठी काढतात, विविध दिन साजरे करतात, विविध प्रकाशने काढतात, मराठीचा वापर, अभिनय स्पर्धा घेतात, साहित्य संमेलनाला मदत करतात, कर्मचाऱ्यांच्या विविध परीक्षा घेतात, प्रत्येक खात्यात मराठी भाषा अधिकारी नियुक्त केला आहे, पुस्तके विक्री करतात, नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांना ५० टक्के सूट देतात, कर्मचाऱ्यांसाठी अभिनय स्पर्धा राबवतात गगराणी यांनी खासगी संस्थांच्या शाळा सुद्धा बंद पडत आहेत असं म्हटलं आहे. त्यांनाही तुम्ही विचारलं पाहिजे असं सुचवलं. मराठी शाळा का बंद पडत आहे.

हा सामाजिक प्रश्न आहे, असं त्यांचं म्हणणं होतं. फक्त आमच्या शाळेची संख्या कमी होत आहे असे नाही, तर इतर खासगी शाळा सुद्धा बंद पडत आहेत. गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे मार्च २०२५ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत महानगरपालिकेच्या मराठी शाळांचा ९५ टक्के इतका निकाल लागला. महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीत ९७ टक्के इतके गुण पटकावले आहेत. यासोबतच गुणवत्ता वाढ, सराव परीक्षा असे उपक्रम राबविण्यात येतात. महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांकडून कोणत्याही स्वरूपाचे फी घेतली जात नाही. विद्यार्थ्यांना २७ प्रकारच्या शैक्षणिक वस्तूंचे मोफत वाटप केले जाते. महानगरपालिकेचा विद्यार्थी खासगी शाळेपेक्षाही अधिक गुणसंपन्न आणि त्याच्याकडे विविध शैक्षणिक सुविधा असाव्यात, यासाठी महानगरपालिका प्रयत्न करते. पालिकेने फाऊंडेशनल लिटरसी व न्यूमरसी निपूण भारतअंतर्गत महानगरपालिकेने केलेल्या प्रयत्नांमुळे तिसऱ्या इयत्तेतील प्रत्येक माध्यमाचा विद्यार्थी उत्तम प्रकारे वाचू शकतो. तसेच, त्या-त्या स्तरावरील गणिताचे ज्ञानही त्याला उत्तमरीत्या अवगत होत आहे. यासाठी महानगरपालिकेने विशेष प्रयत्न केले असून याच चांगले परिणाम दिसून येत आहे. मुंबईतील मराठी शाळा आणि शिक्षण हा सामजिक आणि शैक्षणिक मुद्दा आहे. पालिका प्रशासनाकडून कोणत्याही माध्यमांच्या शाळांचे खासगीकरण करण्यात आले नाही, असा दावा केला. तरीही मुंबई उपनगरातील मराठी शाळा बंद पडत आहेत ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. मराठी शाळा टिकण्यासाठी आता हवी फक्त पालकांची इच्छाशक्ती व मानसिकतेत होणारा बदल आता मराठी शाळा टिकवू शकतात अन्यथा आज पालिका आयुक्तांनी मराठी शाळेबाबत व सर्वस्वी मराठीबाबत आपले भूमिका मांडली. येणाऱ्या काळात ती मांडण्याची संधी मुंबईकरांना मिळणार नाही हे निश्चित.

# संकटातही राजकारणाची ‘काँग्रेसी’ मनोवृत्ती

इराण-इस्त्राइल युद्धामुळे आणि त्यातील अमेरिकेच्या सहभागामुळे संपूर्ण जगापुढे इंधन टंचाईचे संकट अपेक्षेप्रमाणे उभे ठाकले आहे. या संकटामुळे सर्वसामान्य नागरिकांना गॅस, पेट्रोल, डिझेल यासारख्या इंधनाची टंचाई जाणवणार हे उघडच होते. या संकट काळाला सर्व देशाने एकजुटीने तोंड देणे अपेक्षित असते. इस्त्राइल-इराण या देशात विरोधी पक्षांनीही तेथील सत्ताधाऱ्यांची पाठराखण केली आहे.

भारतातील काँग्रेस, कम्युनिस्ट, उबाठा या पक्षातील नेतेमंडळींनी या संकटाचाही आपल्या क्षुद्र राजकीय स्वार्थासाठी वापर केला. काँग्रेसने वेगवेगळ्या माध्यमातून देशात गॅसची टंचाई असल्याच्या अफवा पसरवण्याचे काम जोमाने केले. अशा अफवा पसरवून काँग्रेसला मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीला अडचणीत आणायचे होते. मात्र यातून आपण सर्वसामान्य नागरिकांनाही संकटाच्या खाईत ढकलत आहोत, याचे भान काँग्रेसच्या नेतृत्वाने ठेवले नाही. देशात गॅस टंचाई आहे, अशा स्थितीत नागरिकांनी या स्थितीला संयमाने तोंड द्यावे, अशीच सरकार आणि प्रशासनाची अपेक्षा असते. सरकार आपल्या परीने ही टंचाई लवकरात लवकर दूर करण्यासाठी तातडीने पावले टाकत आहे. असे असताना काँग्रेसने पसरवलेल्या गॅस टंचाईच्या अफवेमुळे सर्वसामान्य माणसात घबराट उडाली. अनेक ठिकाणी गॅस वितरण केंद्रासमोर नागरिकांनी रांगा लावल्या. गॅस मिळालाच नाही तर आपण खायचे काय अशी भीती काँग्रेसने वेगवेगळ्या माध्यमाचा वापर करून पसरवलेल्या अफवेमुळे नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली. समाजात सरकारबद्दल असंतोष निर्माण व्हावा या हेतूनेच काँग्रेसनेच गॅस टंचाईच्या अफवा पसरवण्याचे काम केले. अनेक देशांमध्ये टंचाईमुळे पेट्रोल-डिझेलचे भाव प्रचंड वाढले आहेत.

भारतात पेट्रोल-डिझेल मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात युद्धामुळे



बांग्लादेश मुक्तीला तसेच खुली अर्थव्यवस्था स्वीकारल्यानंतर तत्कालीन काँग्रेस सरकारने घेतलेल्या निर्णयांना जनसंघ, भाजपाने देशहिताचा विचार करुन पाठिंबा दिला. मात्र सोनिया व राहुल गांधींची काँग्रेस सध्याच्या आपत्तीच्या काळात कोणते राजकारण करत आहे.

कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑईल) किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या तरी भारतात पेट्रोल-डिझेलच्या किमतीत वाढ करण्यात आलेली नाही. घरगुती आणि व्यावसायिक गॅसचा पुरवठा हळूहळू पूर्ववत होऊ लागला आहे. मात्र सुरुवातीच्या काळात काँग्रेसने सामान्य माणसाच्या मनात गॅस टंचाईची भीती निर्माण करण्याचे हीन राजकारण खेळले. नागरिकांनी गॅस सिलेंडरसाठी वितरण केंद्रावर एकच गर्दी करावी त्यातून चेंगराचेंगरी, गोंधळ, दगडफेक यासारख्या घटना घडाव्यात आणि त्याचे खापर सरकारवर फुटावे, या घटनांतून मोदी सरकार, भाजपा यांची बदनामी व्हावी, अशा हेतूनेच काँग्रेसच्या मंडळींनी गॅस टंचाईबाबत च्या अफवा पसरवल्या.

युद्ध सुरू झाल्यानंतर जागतिक बाजारात दरवाढ झाल्यामुळे भारतात गॅसच्या किमतीत ६० रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय तेल कंपन्यांना घ्यावा लागला. मात्र ही दरवाढ करण्यापूर्वी वर्षभरापूर्वी घरगुती गॅसच्या किमतीत ३०० रुपयांची कपात करण्यात आली होती, याकडे काँग्रेसने सोयीस्कर दुर्लक्ष केले. तेल कंपन्यांनी घरगुती गॅसच्या दरात ६० रुपयांची वाढ करताच काँग्रेसने त्या विरुद्ध आंदोलन केले. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारच्या काळात गॅसच्या किमती १२०० रुपयापेक्षा अधिक झाल्या होत्या. याचाही काँग्रेस नेतृत्वाला विसर पडला. गेल्या १२-१३ वर्षात अनेक वस्तू, सेवांची वाढ होऊनही भारतातील गॅसच्या किमती ९०० रुपयापर्यंत मर्यादित आहेत. २००९ ते २०१४ या पाच वर्षात मनमोहन सिंग सरकारच्या सत्ता काळात घरगुती गॅसच्या किमतीत ३४० रुपयावरून १२४१ रुपयांपर्यंत वाढल्या होत्या. म्हणजे काँग्रेसची सत्ता असताना घरगुती गॅसच्या दरात पाच वर्षाच्या काळात २६५ टक्के वाढ झाली. मोदी सरकारच्या काळात २०२१-२०२६ या पाच वर्षात गॅसच्या किमतीत सुमारे १३.४ टक्के एवढीच वाढ झाली. २०२१ मध्ये घरगुती गॅसची किंमत ८०५ रुपये होती. २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्धामुळे गॅसच्या किमती एक हजार रुपयापर्यंत वाढल्या. २०२४ नंतर या किमती कमी झाल्या. मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीला या ना त्या निमित्ताने बदनाम करण्याची संधी काँग्रेस नेतृत्व शोधत असते. नोटबंदीच्या काळात तसेच कोरोना काळातही काँग्रेसने अनेक अफवा पसरवल्या होत्या. मात्र सामान्य माणूस काँग्रेसच्या अफवांना बळी पडण्याएवढा दुधखुळा नाही. आताच्या संकटाच्या काळात काँग्रेसने एवढ्या अफवा पसरवूनही नागरिकांनी गॅस मिळवण्यासाठी कोणत्याही प्रकारची गडबड केली नाही.

त्यामुळे काँग्रेसला या संकटाचे अराजकतेमध्ये रूपांतर करण्यात अपयश आले. कोरोना काळात काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी कोरोना प्रतिबंधक लसीबद्दल सामान्य माणसाच्या मनात शंका निर्माण करण्याचे काम केले होते. कोरोनाची लस फायद्याची नाही, असा समज निर्माण केल्यास ही लस कोणीच घेणार नाही, त्यातून कोरोनाचा आजार आणखी पसरेल, असे काँग्रेस नेतृत्वाचे मनसुबे होते. मात्र सामान्य माणसाने काँग्रेसच्या प्रचाराकडे दुर्लक्ष करत कोरोना प्रतिबंधक स्वदेशी लस घेण्यासाठी रांगा लावल्या होत्या. परिणामी कोरोना साथ वेळेत आटोक्यात आली. सत्ताधारी पक्षाला विरोध करणे हे विरोधी पक्षाचे प्रमुख कर्तव्य असते. मात्र या विरोधात तारतम्याचा भागही अत्यंत महत्वाचा असतो.

बांग्लादेशातील १९७१ मधील मुक्ती चळवळीला पाठिंबा देण्याचा निर्णय त्यावेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी घेतल्यावर त्यावेळी प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या जनसंघाने इंदिरा गांधी सरकाच्या मागे ठामपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी जनसंघाचे अध्यक्ष असणाऱ्या अटल बिहारी वाजपेयी यांनी इंदिरा गांधी सरकारला पाठिंबा देण्यामागची व्यापक राष्ट्रहिताची भूमिका जाहीरपणे मांडली होती.

१९९१ मध्ये अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करताना त्यावेळचे पंतप्रधान नरसिंह राव यांना काही कटू निर्णय घ्यावे लागले होते. हे निर्णय तत्काळ घेतले नसते तर देशाची अर्थव्यवस्था प्रचंड संकटात सापडली असती. परंतु त्यावेळी लोकसभेतील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीने नरसिंह राव यांना पाठिंबा देण्याचे ठरवले. राजकारण पलीकडे जाऊन राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचे धोरण जनसंघ आणि भारतीय जनता पार्टीने कायमच अवलंबिले आहे.

सोनिया आणि राहुल गांधी या मायलेकरांना मात्र देशहितासाठी अशी राजकारणा पलीकडची भूमिका कधीच घेता येत नाही. काँग्रेसच्या या क्षुद्र राजकारणामुळे या पक्षाचा जनाधार कमी झाला आहे. संकट, आपत्तीच्या काळात तरी राजकीय स्वार्थाऐवजी काँग्रेस नेतृत्व राष्ट्रहिताला प्राधान्य देईल, अशी अपेक्षा ठेवण्यास आजवरच्या अनुभवामुळे जागा नाही.

# विदेशींकडून ग्राहकहित शिका!




मनुष्याला जगण्यासाठी ‘ऑक्सिजन’ लागतो. आजच्या काळात ‘भ्रमणभाष’ हा मनुष्यासाठी जणू ‘ऑक्सिजन’ झाला आहे. एकवेळ जेवण नसले, तरी चालेल; पण भ्रमणभाष हवाच! मग त्यासाठी कितीही पैसे मोजावे लागले, तर चालतील. नागरिकांच्या या मानसिकतेचाच अपलाभ दूरसंचार आस्थापने उठवत आहेत. या विषयाच्या अनुषंगाने संसदेमध्ये आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढा यांनी नुकताच भ्रमणभाष रिचार्जविषयी दूरसंचार आस्थापने आणि सरकार यांना प्रश्न विचारला होता. त्यांनी विचारले की, वर्षभरात महिन्याचा भ्रमणभाष ‘रिचार्ज’ (भ्रमणभाषचे देयक) करायचा झाला, तर १२ ऐवजी तो १३ वेळा का करावा लागतो? आस्थापनांनी २८ दिवसांची ‘रिचार्ज’ची कार्यपद्धत ठेवल्याने असे होत असून ही व्यवस्था सामान्य नागरिकांसाठी ‘लपवलेल्या लुटी’सारखी आहे. या वेळी त्यांनी २८ दिवसांचे गणितही मांडले. यातून ‘आस्थापने एक अतिरिक्त रिचार्ज नागरिकांकडून कशा प्रकारे उकळत आहेत’, हेही त्यांनी सांगितले. ‘रिचार्ज योजना अधिक पारदर्शक आणि ग्राहकहितकारी कराव्यात’, अशी मागणी त्यांनी या वेळी केली. खासदारांनी कोट्यवधी ग्राहकांच्या मनातील प्रश्न विचारला आहे. त्यामुळे अनेक ग्राहकांनी त्यांना समर्थन दिले. बहुतांश वेळा सामाजिक माध्यमांवर सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही स्वरूपाच्या प्रतिक्रिया उमटतात; पण या विषयाच्या संदर्भात नकारात्मक किंवा विरोधी मत कुणाचेच नव्हते. अनेकांनी ‘आम्ही तुमच्या पाठीशी आहोत’, ‘१०० टक्के अचूक मत’, ‘रास्त मागणी’, ‘भ्रमणभाष भ्रष्टाचार’ असे अभिप्राय दिले आहेत. यावरूनच लक्षात येते की, ग्राहक असोत किंवा नागरिक असोत, सर्वांचा आवाज संसदेपर्यंत पोचणे किती आवश्यक असते! ‘ग्राहकहिताय, ग्राहकसुखाय’ हे प्रत्येक व्यवस्थेने लक्षात ठेवावे. व्यवसायाचा केंद्रबिंदू ग्राहक असला पाहिजे आणि त्याचे हित अन् समाधान हेच सर्वाधिक महत्त्वाचे मानले गेले पाहिजे. ग्राहकांचे हक्क आणि हित यांची जोपासना झाली, तरच संबंधित व्यवस्था बळकट होते. सर्वच लोकप्रतिनिधींनी याचा अवश्य विचार करावा!

दूरसंचार आस्थापनांच्या वरील प्रकारच्या रिचार्जमुळे खिशाला कात्री लागत असल्याने ग्राहकांच्या मनातही अस्वस्थता असते. आर्थिकदृष्ट्या किती हानी होत आहे, ते ग्राहकाला समजते; पण दूरसंचार क्षेत्रात झपाट्याने होणारे पालट पहाता ती आजच्या काळाची आवश्यकता झाल्याने प्रत्येक ग्राहक रिचार्जच्या ओज्याखाली दबलेला असतो. दूरसंचार आस्थापनांच्या दृष्टीने २८ दिवसांची योजना ही त्यांच्या देयक यंत्रणेशी सुसंगत असून ४ आठवड्यांचा कालावधी ठरवणे त्यांच्यासाठी व्यवस्थापनदृष्ट्या सोयीचे ठरते. असे असले, तरी येथे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे व्यवसाय सुलभ करण्यासाठी ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकणे कितपत योग्य आहे? ‘ग्राहकाच्या हिताला दुय्यम स्थान देऊन केवळ व्यवस्थापनाच्या सोयीसाठी धोरण आखणे योग्य नाही’, याचा आस्थापनांनी विचार करावा. अन्य मोठमोठ्या आस्थापनांमध्येही प्रत्येक महिन्याचे वेतन दिले जाते. तेथे २८ दिवस असे गणित कधीच नसते. मग येथेच ग्राहकांवर अन्याय का? ‘अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत आवश्यकता आहेत’, असे आजवर आपल्याला ठाऊक होते; पण आता त्यात चौथी आवश्यकता म्हणून भ्रमणभाषही अंतर्भूत झाला आहे. मानवाची हीच दुबळी बाजू लक्षात घेऊन दूरसंचार आस्थापने सर्रास लूट चालवत आहेत. यावर नियंत्रण मिळवणे अपरिहार्य आहे. जर एखादी योजना ‘मासिक’ म्हणून विकली जात असेल, तर तिची वैधता ३० किंवा ३१ दिवसांची असणे अपेक्षित आहे; पण तसे न होणे ही ग्राहकांची दिशाभूल, नव्हे ती फसवणूकच ठरते.

१२ ऐवजी १३ वेळा रिचार्ज केले जात असल्याने या आस्थापनांना किती मोठ्या प्रमाणात लाभ मिळत असेल, याची कल्पनाही आपण करू शकत नाही. ग्राहकांचे खिसे कापायचे आणि आपले खिसे पुरेपूर भरायचे, हे त्यांना चांगले जमते. भारतासारख्या मोठ्या बाजारपेठेत भ्रमणभाषचे कोट्यवधी ग्राहक आहेत. तेथे तर हा लाभ अब्जावधी रुपयांत जात असावा. त्याची गणती कोण करणार? त्याला विरोध कोण करणार? हे अस्पष्टच आहे. दिवसभर पोटापाण्यासाठी राबणारा ग्राहक आपल्या कुटुंबियांशी बोलता आले आणि ‘डेटा’चा वापर करून काही वेळ मनोरंजन करता आले की, त्यातच तो समाधान मानतो. जरी दूरसंचार आस्थापनांचे षड्यंत्र त्याला लक्षात आले, तरी त्याविरोधात आवाज उठवायला तो कुठे जाणार ? हे आस्थापनांना ठाऊक आहे. त्यामुळे त्यांची लूट चालूच रहाते. हे आणखी कुठवर चालू रहाणार आहे ? खासदार राघव चड्ढा यांनी लुटीचा विषय समोर आणला. आता सरकारने या विषयाचा गांभीर्याने अभ्यास करून आस्थापनांना वेळीच वठणीवर आणून ग्राहकांना दिलासा द्यायला हवा; कारण हा त्यांच्या हक्काचा प्रश्न आहे. अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये ग्राहकांचे हित जपण्याला प्राधान्य दिले जाते. जपानमध्ये तर ग्राहक अप्रसन्न झाल्यास संबंधित आस्थापन सार्वजनिकरित्या क्षमा मागते. भारतात मात्र ग्राहकांना न्याय मिळवण्यासाठी पुष्कळ वेळ लागतो. भारतातील ग्राहकहिताच्या कायद्यांची कार्यवाही कठोरपणे व्हायला हवी. भारतातील दूरसंचार क्षेत्राचे नियमन दूरसंचार नियामक प्राधिकरण (‘ट्राय’) करते. ‘ट्राय’च्या नियमांनुसार आस्थापनांनी किमान ३० दिवस किंवा त्याहून अधिक वैधतेची एक योजना उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. ‘ट्राय’ची भूमिका अधिक सक्रीय व्हायला हवी. केवळ पर्याय उपलब्ध करून न देता ग्राहकांच्या हिताचे संरक्षणही व्हायला हवे.

खासदारांनी मांडलेल्या विषयावर लवकरात लवकर चर्चा होईल आणि दिलासाजनक निर्णय घेतला जाईल, अशी ग्राहकांना अपेक्षा आहे. दूरसंचार आस्थापनांसमोर सरकारने लाचारी न पत्करता दूरसंचार विश्वात क्रांती घडवण्यासाठी तत्परतेने पावले उचलावीत!

आतापर्यंत दूरसंचार आस्थापनांनी ग्राहकांचा अशा प्रकारे पैसा लुटला असेल, तर या योजना द्यायला प्रारंभ केला, त्याच वेळी ते ‘ट्राय’च्या लक्षात का आले नाही? आता तरी यासंदर्भात त्वरित कारवाई होणे आवश्यक आहे. जर आस्थापनांनी ग्राहकांच्या हिताचा विचार न करता केवळ लाभाचा मार्ग स्वीकारला, तर याचा फटका त्यांच्या विश्वासार्हतेला बसू शकतो. त्यामुळे दूरसंचार आस्थापनांनी त्यांच्या धोरणांचा पुनर्विचार करून ग्राहकांच्या अपेक्षांना न्याय द्यावा. दूरसंचार क्षेत्राचे हे केवळ व्यावसायिक कर्तव्य नसून ते सामाजिक आणि राष्ट्रीय कर्तव्यही आहे. राष्ट्रहितार्थ असलेले दायित्व लक्षात घेता सेवेत पारदर्शकता आणि सुलभता ठेवणे, हीच दूरसंचार क्षेत्राची खरी राष्ट्रसेवा आहे!

# शाम्पूच्या वापरामुळे केसगळतीची समस्या वाढते का?

**कधीकधी अचानक केस खूप गळत असल्याचे तुमच्या लक्षात येते.केस गळण्याचे कारण शोधताना मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपणे आपण रोज केस स्वच्छ धुण्यासाठी शाम्पूचा वापर करतो. त्यामुळे आपण वापरत असलेल्या शाम्पूमुळे तर केस गळत नाहीत ना? किंवा कोणता शाम्पू आपल्या केसांसाठी योग्य असू शकतो? हे प्रश्न आपल्याला पडू शकतात.**



केस गळणे ही अनेकांना भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. मात्र केस गळण्याची कारणे प्रत्येक व्यक्तीमध्ये निरनिराळी असू शकतात. डॉ. अपूर्वा शाह यांनी त्यांच्या 'हॅव अ ग्रेट हेअर डे' या पुस्तकामध्ये शाम्पू केल्यामुळे केस गळत नाहीत किंवा तेलांमुळे केसांच्या त्वचेतील मुळे बंद होत नाहीत, असे मत मांडले आहे. त्याचप्रमाणे हेअर एक्सपर्ट जावेद हबीब यांनी देखील त्यांच्या 'हेअर योगा' या पुस्तकामध्ये शाम्पूच्या वापरामुळे केस गळत नाहीत, या सत्याचा उलगडा केला आहे.

अयोग्य शाम्पू वापरल्यामुळे मात्र तुमच्या केसांची मुळे नक्कीच कमजोर होऊ शकतात. त्यामुळे बरेच दिवस तुमचे केस गळत राहतात व केसांचे खूप नुकसान होते. यासाठी तुमच्या केसांच्या प्रकारानुसार योग्य शाम्पूचा वापर करणे गरजेचे आहे.

### योग्य शाम्पू कसा निवडाल?

तुमच्या केसांचा प्रकार ओळखून योग्य शाम्पूची निवड करा. बाजारात अनेक ब्रॅण्डचे शाम्पू उपलब्ध असले तरी त्यातून तुमच्यासाठी योग्य प्रकारच्याच शाम्पूची निवड करा. त्याचप्रमाणे दर ४ ते ५ आठवड्यांनी तुमच्या शाम्पूचा ब्रॅण्ड बदला. सतत एकाच ब्रॅण्डचा शाम्पू वापरल्यामुळे तुमच्या केसांमधील त्वचेवर त्याचा दुष्परिणाम होतो व तुम्हाला हवा तसा योग्य बदल दिसून येत नाहीत.



**योग्य शाम्पूची निवड करण्यासाठी आधी तुमच्या केसांचा प्रकार ओळखा –**

- **ऑईली हेअर** – काही दिवस केसांमधील त्वचा तेलकट असते, पण केसांची शेवटची टोके कोरडी असतात.
- **ड्राय हेअर** – केस खरखरीत असतात, जे लवकर गुंततात व कुरळे किंवा फ्रिजी असतात.
- **नॉर्मल हेअर** – केसांचा पोत अति कोरडा अथवा अति तेलकटही नसतो.
- **डॅमेज हेअर** – या केसांमध्ये कोंडा किंवा केस दुभंगण्याची (स्प्लीट एण्ड) समस्या असते.
- **लीम्प हेअर** – केस सपाट असतात, ज्यांचा व्हॉल्युम जास्त नसतो किंवा केस फुललेले नसतात.

# ॲल्युमिनियम फॉईलमध्ये पदार्थ का शिजवू नयेत?

**जर** तुम्ही दररोज जेवणासाठी ॲल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे.

नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून असे समोर आले आहे की ॲल्युमिनियम फॉईलमध्ये शिजवलेले अथवा गुंडाळलेले पदार्थ खाल्ल्याने शरीरावर परिणाम होतो.

जेव्हा ॲल्युमिनियम फॉईलमध्ये अन्न शिजवले जाते, त्यावेळी मोठ्या प्रमाणात ॲल्युमिनियम अन्नात मिसळते आणि हे अन्न खाल्ल्याने ते शरीरात जाते. यामुळे हाडांचे आजार तसेच ब्रेन सेल्सची वाढ कमी होण्याची शक्यता असते.



# बटाट्याची रोटी



**साहित्य :** उकडलेले बटाटे - 4, तांदळाचं पीठ - 1 कप, कणिक - 1 कप, आलं, लसूण आणि मिरचीची पेस्ट - 1 चमचा, चिली फ्लेक्स - 1/2 चमचा, ओरिगॅनो - चिमूटभर, चाट मसाला - चिमूटभर, चिरलेली कोथिंबीर - आवश्यकतेनुसार, मीठ - चवीनुसार

**कृती :** बटाटे उकडून ते किसून घ्यावेत. किसलेल्या बटाट्यात आलं-लसूण आणि मिरची पेस्ट, चिरलेली कोथिंबीर, चाट मसाला, ओरिगॅनो आणि चिली फ्लेक्स घालून मिक्स करा. आता या मिश्रणात तांदळाचं पीठ आणि कणिक घालून एकजीव करा. आवश्यकतेनुसार पाणी न घालता बटाट्याच्या ओलसरपणात पीठ भिजवून घ्यावे. मळलेल्या पिठाला तेलाचा हात लावा आणि आणि 10 मिनिटे झाकून ठेवा. 10 मिनिटांनंतर पिठाची रोटी लाटून घ्यावी. तव्यावर तूप किंवा तेल लावून रोटी भाजून घ्या. तयार पराठे मुलाच्या डब्यासाठी एक परफेक्ट रेसिपी आहे.

# आवळा सरबत प्या, हे १० आजार टाळा

**आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आवळा उत्तम आहे. आवळा सरबत घेतल्याने आपल्याला अनेक फायदे होतात. आपले आरोग्य चांगले राहते. आयुष्य वाढण्यास मदत होते. आयुर्वेदातही आवळ्याला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. आवळा सरबतात मध मिसळले तर अधिक चांगले. तसेच आवळा ज्यूसमुळे महिलांच्या पाळीची समस्या दूर होण्यास मदत होते.**



- आवळा ज्यूस आणि मध एकत्र करून प्यायल्याने दम्याचा प्रभाव कमी होतो.
- रक्त शुद्ध करण्यासाठी आवळा सरबत आणि मध खूप गुणकारी आहे.
- आवळा सरबत नियमित घेतल्यास कोलेस्ट्रॉल कमी होते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका टळण्यास मदत होते.
- आवळा खाण्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. कारण मेटाबॉलिजम व्यवस्थित होऊन वजन कमी होते.
- आवळा हा पाचक आहे. त्यामुळे पचन व्यवस्था व्यवस्थित राहते.
- आवळा सरबत प्यायल्याने चेहऱ्याला ग्लो येतो. तसेच त्वचारोग दूर होण्यास मदत होते.
- लघवीचा ज्यांना त्रास आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. सरबत प्यायल्याने लघवीसंबंधीचे आजार दूर होतात.
- ज्यांना किडनी स्टोनचा आजार आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. मूतखड्याचा आजार दूर होण्यास मदत होते.
- आवळ्यामुळे मधुमेह (Disbetes) नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- सतत तोंड येत असेल तर आवळा सरबत प्यायल्याने ही समस्या दूर होते. तसेच डोळ्यांची शक्ती वाढण्यास मदत होते.

# आला उन्हाळा, हे ध्यानात ठेवा!

- **उन्हाळा** आल्यावर अनेकदा शरीराला नवीन तापमानाशी जुळवून घेण्यात वेळ लागतो. अशात काही लहान आणि सामान्य गोष्टी असतात ज्यांचा आम्हाला विसर पडत असतो तर त्यांना रिकॉल करायला कुठलीच हरकत नसावी.
- आता गरज आहे घरातून बाहेर निघताना सनस्क्रीन लोशन लावण्याची आणि स्कीन झाकून निघण्याची. सोबत पाण्याची बॉटल किंवा ग्लुकोज असणे उत्तम. कॉटनचे हलक्या रंगाचे कपडे परिधान करणे योग्य ठरेल.
- आहार बदल सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे. म्हणून आता मसालेदार, स्पाईसी, तळकट खाणे टाळा. लिक्विड डाइट अधिक घ्या. घरातून बाहेर पडण्यापूर्वी लिंबू पाणी, ताक किंवा फ्रूट ज्यूसचे सेवन करणे विसरू नका.
- उन्हाळ्यातील फळं कलिंगड, काकडी, खरबूज, द्राक्ष, संत्री, स्ट्रॉबेरी, नारळ पाणी, आंबा आपल्या आहारात सामील करा.
- उन्हाळ्यात रॉक साल्ट, जिरं, बडीशेफ आणि वेलची सारखे मसाले वापरून दही, कैरीचं पना, पुदिना, थंडाई, सातू हे सेवन करणे शरीरासाठी अनुकूल ठरेल.



# केसगळती रोखणारा 'वन मिनिट' उपाय!

**केसगळती ही काही प्रमाणात प्रत्येकामध्ये आढळून येते. केसगळतीचे प्रमाण दिवसाला १०० पेक्षा अधिक असल्यास ती समस्या गंभीर आहे. या समस्येचे एक कारण म्हणजे टाळूला होणारा अपुरा रक्तप्रवाह! मग त्यावरचा एक उपाय म्हणजे टाळूला मसाज करा.**



**केस** धुतल्यानंतर बोटांनी टाळूला मसाज करणे हा केसगळती रोखण्याचा एक सहज-सोपा घरगुती उपाय आहे. मग केसगळती रोखण्यासाठी जरूर टाळा या चुका!

**कसे आहे फायदेशीर?**

डॉ. एच. के. भाकरू यांच्या 'होम रेमेडीज फॉर कॉमन इएलमेंट्स' या पुस्तकात लिहिल्यानुसार थंड पाण्याने केस धुतल्यानंतर टाळूवर हातांच्या बोटांनी मसाज करावा. यामुळे डोक्याजवळील रक्तवाहिन्यांना चालना मिळाल्याने रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसांची वाढदेखील सुधारते.



**तुम्ही काय कराल ?**

तुमच्या सोयीनुसार पाण्याचे तापमान, शाम्पूने केस धुवा. मात्र शेवटी ते कोमट किंवा साध्या पाण्याने धुवून निथळत ठेवा. यामुळे केस गुंतण्याची शक्यता कमी होते. केसांचे गुंतणे रोखण्यासाठी करून पहा हे उपाय.

काही वेळाने केस टॉवेलने पुसा आणि कोरडे करा. त्यानंतर हाताच्या बोटांनी गोलाकार दिशेने मसाज करा.

**खबरदारीचा उपाय**

मसाज करताना तो हळूवार आणि समान प्रमाणात असावा. खूप जोरजोरात केस घासणे, मसाज करताना नखांचा वापर करणे टाळा. यामुळे केसांचे नुकसान होऊ शकते.

## सायीचा उपयोग रंग उजळण्यासाठी करावा

- मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपरावर लावल्यास रंग उजळतो.
- तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.
- सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.
- मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.
- एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.
- सायीचा उपयोग औषधासारखाही होतो.



# दही कधी खावे?

**संपूर्ण** वर्षभरामध्ये ज्या ऋतूमध्ये दही अगदी निषिद्ध समजले पाहिजे, असा ऋतू म्हणजे वसंत. वसंत म्हणजे थंडीनंतर येणारा उन्हाळा, सध्या सुरू असलेले दिवस. वसंत ऋतूमधील कफ प्रकोपाचा विचार करता पाळावयाचा नियम म्हणजे दही वर्ज्य करणे. शरीरामध्ये कफ वाढवणारे दही वसंत ऋतूमध्ये सेवन करण्याचा निषेध शास्त्राने केला हे स्वाभाविकच आहे. वसंत ऋतूमधील दह्याचे काही विशिष्ट गुणदोष असतात. ते दही गोड व आंबट चवीचे असते. गोड व आंबट हे दोन्ही रस वसंतामध्ये टाळणे अपेक्षित आहे. ते शरीरामध्ये स्निग्धत्व वाढवणारे असते. वसंत ऋतूमध्ये स्निग्धत्व वाढवणारा आहार टाळायचा असतो. याशिवाय वसंतातल्या दह्याचा अजून एक दोष म्हणजे ते वातल (वात वाढवणारे) असते. त्यामुळे वात प्रकृतीच्या व्यक्तींना, वातविकाराने त्रस्त लोकांना ते योग्य नाहीच.

याशिवाय दही हे अभिष्यन्दी आहे, म्हणजे स्राव वाढवणारे आहे, ज्या दोषामुळे शरीरामध्ये पाणी वाढते. वसंत ऋतूमध्ये आधीच कफ पातळ झाल्यामुळे शरीरामध्ये स्राव, पाणी वाढलेले असताना दह्याचा शास्त्राने निषेध केलेला आहे. दही हे सूज सुद्धा वाढवते, अर्थात अतिप्रमाणात व अवेळी सेवन केले तर. दह्याबाबत वसंत ऋतू ही अवेळ आहे. वसंतामध्ये कफाचा जोर असताना सांधे हे कफाचे स्थान असल्याने सांध्यामधल्या श्लेष्मल त्वचेला सूज येण्याची व त्या श्लेष्मल त्वचेमधून स्राव वाढण्याची शक्यता बळावते. म्हणूनच सूज व स्राव वाढवणाऱ्या दह्याचा त्याग या दिवसांमध्ये करायचा आहे. अर्थात जिथे-जिथे स्राव स्रवतात, ते स्राव वाढवण्याचा, जिथे-जिथे सूज आहे तिथे सूज वाढवण्याचा धोका वसंतामध्ये दही खाल्ल्याने बळावतो.

या दिवसांमध्ये उन्हाळा सुरू झाला म्हणून दह्याचे सेवन सुरू केल्यानंतर विविध कफविकार, उष्णतेचे विविध रोग आणि सूजसंबंधित विकृती झाल्याचे अनुभव दरवर्षी अनुभवायला मिळतात.

उपचाराला दही न खाण्याची जोड दिली तरच हे आजार बरे होतात. केवळ औषधोपचारानंतर आजाराची लक्षणे कमी होतात; पण तात्पुरती; दही खाणे थांबवल्यानंतर मात्र या रुग्णांना आराम मिळालेला दिसतो.



# ऐन कामाच्या वेळी फोन नेटवर्कने धोका दिला?
## बदला ही सेटिंग, खराब नेटवर्कमध्येही करता येईल कॉल


**फोनमध्ये खराब नेटवर्क असल्यास कॉल करताना खूप त्रास होतो. महत्त्वाची कामंसुद्धा यामुळे रखडू शकतात. तुम्हालाही दररोज या समस्येचा सामना करावा लागत असेल, तर वाय-फाय कॉलिंग तुमची मदत करेल. या ट्रिकच्या मदतीने तुम्ही खराब नेटवर्कमध्येही स्पष्ट व्हॉइस कॉल करू शकाल. ही खास युक्ती अँड्रॉइड तसेच आयफोन युजर्ससाठी आहे. वाय-फाय कॉलिंगसाठी तुम्हाला वाय-फायमध्ये प्रवेश आवश्यक आहे. यानंतर फोनचे नेटवर्क खराब असले तरीही तुम्ही आरामात कॉल करू शकाल. अँड्रॉइड स्मार्टफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सुरू करावे ते पाहा.**

**गुगल पिक्सेल डिव्हाइसेस**

सर्वात आधी फोनच्या सेटिंगमध्ये जा. नेटवर्क आणि इंटरनेट पर्यायावर टॅप करा नंतर कॉल आणि एसएमएस पर्यायावर जा. वाय-फाय कॉलिंग पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग वापरण्यासाठी टॉगल चालू करा.

**वन प्लस युजर्स**

फोनच्या सेटिंग्जमध्ये दिलेल्या मोबाइल नेटवर्क पर्यायावर जाऊन सिम १ वर टॅप करा. नंतर वाय-फाय कॉलिंगचा पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग चालू करा. येथे तुम्ही उपलब्ध नेटवर्कमध्ये वाय-फाय आणि सेल्युलर कॉलिंगचे प्राधान्य देखील सेट करू शकता.



**आयफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सक्रिय करावे?**

सर्वप्रथम सेटिंगमध्ये दिलेल्या फोन ऑप्शनवर जा. नंतर वाय-फाय कॉलिंग पर्यायावर टॅप करा. वाय-फाय कॉलिंग चालू करण्यासाठी टॉगल चालू करा. जर वाय-फाय कॉलिंग सेवा उपलब्ध असेल, तर तुम्हाला स्क्रीनवर ऑपरेटरच्या नावापुढे वाय-फाय दिसेल.

**सॅमसंग आणि बहुतेक अँड्रॉइड डिव्हाइसेस**

प्रथम फोन ॲप उघडा. नंतर वरच्या उजव्या बाजूला दिलेल्या थ्री डॉट्सवर टॅप करा. सेटिंग्ज उघडण्यासाठी टॅप करा. येथे तुम्हाला वाय-फाय कॉलिंगचा पर्याय दिसेल. ते उघडा आणि टॉगल चालू करा.

# बर्फाच्या पाण्याचे सेवन करत असाल तर सावधान!

**उन्हाळ्यात** तहान भागवण्यासाठी आपण सगळेच थंड पाणी पितो अथवा बर्फ टाकून पाणी पितो, मात्र अधिक थंड पाणी प्यायल्यामुळे पचनास त्रास होतो. यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात.

- थंड पाण्यामुळे नसा आखडतात. यामुळे पचनाची क्रिया संथ होते आणि बद्धकोष्ठता, गॅस यासारख्या समस्या निर्माण होतात.
- उन्हाळ्यात बाहेरचे तापमान अधिक असते. यात थंड पाणी प्यायल्यास छातीत कफ जमा होऊ लागतो. थंड पाणी प्यायल्यानंतर शरीराचे तापमान मेंटेन करण्यासाठी शरीराला मोठ्या प्रमाणात एनर्जी खर्च करावी लागते. याचा परिणाम पचन संस्थेवर होतो.
- थंड पाण्यामुळे नसा संकुचित होतात. यामुळे हृदयाला ब्लड पंप करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. यामुळे हार्ट बीट संथगतीने होतात.
- थंड पाणी प्यायल्याने प्रतिकारक क्षमता कमी होते. यामुळे ॲलर्जी तसेच आजारांची भीती वाटते.
- थंड पाणी प्यायल्याने शरीराचे तापमान अचानक बदलते. ज्याचा परिणाम डोकेदुखीसारख्या समस्या उद्भवतात.



# फोनमध्येच भारी फोटो कसे काढाल? 'या' सोप्या टीप्स करा फॉलो

**आजकाल आपण कुठेही फिरायला गेलो तर तिथे सर्वात जास्त कोणतं काम करत असू तर ते फोटोग्राफी. म्हणजे प्रत्येक गोष्टीचे फोटो काढून ते सोशल मीडियावर आपण अपलोड करतच असतो. त्यात आता ते दिवस गेले जेव्हा लोक त्यांच्या आठवणी टिपण्यासाठी अर्थात फोटो काढण्यासठी मोठमोठे कॅमेरे वापरत होते. आता यासाठी बहुतेक जण मोबाईल फोनच वापरतात. तसेच, स्मार्टफोन कॅमेरे देखील दिवसेंदिवस सुधारत असताना, त्यापैकी बरेच जण जवळजवळ डीएसएलआरसारखे फोटो देतात.तर आज आम्ही तुम्हाला मोबाईल फोटोग्राफीच्या अशाच काही टीप्स आणि युक्त्या सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही स्वस्त स्मार्टफोनमध्येही कॅमेऱ्यासारखे भारी फोटो काढू शकता.**

**स्मार्टफोनचा कॅमेरा कसा आहे ते आधी समजून घ्या**

स्मार्टफोन वापरून चांगले फोटो कॅप्चर करण्यासाठी सर्वात आधी तुम्हाला तुमच्या फोनचा कॅमेरा कसा आहे म्हणजेच त्याची क्षमता किती आहे ते जाणून घेणं गरजेचं आहे. कारण फोनचं कॅमेरा सेटअप जसं असेल त्यानुसारच फोटो येणार आहेत. पण आम्ही सांगणाऱ्या टीप्समुळे तुम्ही तुमच्या फोनच्या कॅमेऱ्याचा पुरेपुर वापर करून फोटो क्लिक करू शकता. आजकाल बहुतेक आधुनिक फोन अनेक लेन्स सेटअपसह येतात जे वापरकर्त्यांना अल्ट्रा-वाइड अँगल लेन्स, टेलीफोटो लेन्स, डेडिकेटेड पोर्ट्रेट लेन्स, मॅक्रो लेन्स हे सर्व ऑफर करतात. या सर्वांच्या मदतीने तर फोटोज आणखीच भारी येतात.

**फोटो काढताना फ्रेमवर खास लक्ष द्या**

तुम्ही कोणत्याही वस्तूचा किंवा व्यक्तीचा फोटो घेत असाल तर तो पूर्णपणे फ्रेममध्ये योग्यरीत्या असेल हे लक्षात ठेवा. म्हणजेच ऑब्जेक्ट फ्रेममध्ये चांगला आला पाहिजे आणि अंतरही अधिक नसावं. तसंच कॅमेऱ्याची उंची योग्यरीत्या सेट करून परफेक्ट फ्रेममध्ये फोटो काढावा.

**तुमची लेन्स स्वच्छ करा**

ही एक अत्यंत सोपी ट्रिक असली तरी नक्कीच प्रभावी अशी ट्रिक आहे. कारण स्मार्टफोनच्या कॅमेरा लेन्स दिसतात, त्याहूनही अधिक घाण असतात. त्यामुळे त्या पूर्णपणे स्वच्छ केल्याने तुम्हाला चांगले आणि डिटेल्ड फोटो मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे फोटो काढण्यापूर्वी स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याची लेन्स नीट साफ करावी. कायमच लेन्सची काळजी घेणं फायद्याचं आहे.

**दोन्ही हात वापरा**

चांगला फोटो काढण्यासाठी नेहमी दोन हात वापरा, जेणेकरून तुमची फोनवरील पकड चांगली होईल आणि तुम्ही ऑब्जेक्ट आरामात कॅप्चर करू शकता. फोनवरील पकड चांगली असल्याने फोटो घेताना फोन हलणार नाही, ज्यामुळे फोटोही ब्लर किंवा चुकीच्या अँगल, फ्रेममध्ये येणार नाही. त्यामुळे दोन्ही हातांचा वापर करून फोटो काढणे, ही एक भारी ट्रिक आहे.

**अतिरिक्त प्रॉडक्ट्स वापरा**

डीएसएलआर कॅमेऱ्यांप्रमाणे, फोनसाठीही अतिरिक्त प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. जसं की, ट्रायपॉड, रिंग लाइट आणि अतिरिक्त लेन्स अशा विविध प्रॉडक्ट्सचा शक्य असल्यास वापर करावा. या सर्व उपकरणांच्या मदतीने फोटो अधिक भारी येतील. ट्रायपॉडने फोटो स्थिर येतील. रिंग लाईट प्रकाश ॲडजेस्ट करेल.



**झूमचा योग्य वापर**

फोटो घेण्यासाठी झूम या फीचरचा वापर योग्यरीत्या आणि जपून वापरा. कारण अधिक झूम केल्याने फोटोची क्लीॲरिटी खराब होते. त्यामुळे आवश्यक आणि शक्य असल्यास फोटो घेत असलेल्या ऑब्जेक्टच्या जवळ जा. अधिक झूममुळे फोटोचे रिझोल्युशन खराब होऊ लागते आणि स्वस्त फोनमध्ये डिजिटल झूम फारसे चांगले नसते. तसेच स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असलेले वेगवेगळे मोड वापरा जेणेकरून फोटो अधिक चांगले येतील. मोबाईल फोनमध्ये पोर्ट्रेट, नाईट, प्रो आणि स्लो-मो असे अनेक पर्याय आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही चांगला फोटो काढू शकता.

**योग्य फोकसही महत्त्वाचा**

फ्रेमिंग ही देखील महत्त्वाची गोष्ट आहे. हे आम्ही वरच सांगितलं. फोटो काढताना ऑब्जेक्टला योग्य ठिकाणी ठेवणं महत्त्वाचं आहे. तसंच फोकसही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कारण फोटो काढताना फोकस योग्यरीत्या केल्यावर ऑब्जेक्टचा फोटो अधिक भारी आणि क्लीअर येईल. फ्रेममधून अनावश्यक वस्तू काढून टाकण्यासह फोकसिंग ही एक अत्यंत उपयोगी टीप आहे.

**एचडीआर मोडचा वापर**

हाय डायनॅमिक रेंज म्हणजेच एचडीआर या मोडच्या मदतीने तुम्ही भारी भारी दर्जाचे फोटो क्लिक करू शकता. म्हणजेच तुम्ही एखादा मोठा फोटो क्लिक करत असाल तर अशा वेळी तुम्ही एचडीआर वापरू शकता. यासह, तुम्हाला तुमच्या फोटोमध्ये बरेच तपशील पाहायला मिळतील. एचडीआर एकाधिक एक्सपोजर कॅप्चर करते आणि फोटोच्या प्रकाश आणि गडद भागांमध्ये चांगले संतुलन राखते. एचडीआरमध्ये पार्क, इमारत, मंदिर किंवा मोठ्या वस्तूचा फोटो क्लिक करणे एक चांगला पर्याय आहे.

# मिठी नदीच्या कामाला येत्या १ एप्रिलपासून होणार सुरुवात

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

मुंबईतील २६ जुलैच्या महापुराला कारणीभूत ठरलेल्या मिठी नदीतील गाळाची सफाई करण्यासाठी आतापर्यंत कंपन्याच पुढे येत नसल्यामुळे मिठीची सफाईच्या कामापुढे प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. आजवर केलेल्या निविदा प्रक्रियेत एकही कंपनी पुढे येत नसल्याने हे पर्जन्य जलवाहिनी विभागामार्फत याचे काम करायचे का या विचारात असतानाच यासाठी अखेर महापालिकेला कंत्राटदार पावले. मिठी नदीच्या तीन भागातील कामांसाठी मागवलेल्या गाळ काढण्याच्या निविदेसाठी प्रत्येकी दोन कंपन्यांनी सहभाग नोंदवला असून ही निविदा तातडीने अंतिम करून शुक्रवार ते शनिवारपर्यंत कंत्राटदाराची निवड केली जाणार आहे. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून पूर्ण क्षमतेने मिठीतील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात केली जाणार असल्याची ग्वाही अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी स्थायी समितीत दिली.



**मिठी नदीतील गाळ काढण्यासाठी किती निविदा प्राप्त झाल्या**
- फिल्टरपाडा, पवई ते टीचर्स कॉलनी आउटफॉल, कुर्ला
  - निविदा प्राप्तः ०२
- टीचर्स कॉलनी, कुर्ला ते न्यू बीकेसी कनेक्टर ब्रिज
  - निविदा प्राप्तः ०२
- न्यू बीकेसी कनेक्टर ब्रिज ते माहिम कॉजवे आणि त्याचे उपनाले
  - निविदा प्राप्तः ०२

मिठी नदीच्या कामासाठी यापूर्वी नेमलेल्या तीन पैकी दोन कंपन्यांवर गुन्हा दाखल असून एका कंपनीला काळ्या यादीत टाकले आहे. त्यामुळे मिठी नदीसह एस विभाग आणि एम पश्चिम विभागातील मोठ्या नाल्यांच्या सफाईसाठी महापालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाच्या वतीने जुन्या निवायदा अटी वगळून सुधारित अटीनुसार निविदा मागवण्यात आल्या होत्या. आजवर यासाठी मुदतवाढ देऊनही याला कोणत्याही कंपनीच्या वतीने प्रतिसाद दिला जात नव्हता. त्यामुळे अखेर पर्जन्य जलवाहिनी विभागाच्या वतीने यांत्रिक सेवा भाडेतत्वावर तसेच रोजगार संस्थांकडून मनुष्यबळाची सेवा पुरवून ही सफाई पूर्ण करण्याचा विचार केला होता.

मुंबईतील या नालेसफाई तसेच मिठी नदीच्या गाळाची सफाई कामांसंदर्भात पर्जन्य जलवाहिनी विभागामार्फत स्थायी समितीच्या सभेत सादरीकरण करण्यात आले. या सभेमध्ये मिठी नदीच्या कामासाठी मागवलेल्या निविदेसाठी मंगळवारी शेवटची तारीख होती. त्यामुळे सायंकाळी पर्यंत मिठी नदीच्या तीन भागातील कामांसाठी प्रत्येकी दोन कंपन्यांनी सहभाग नोंदवला असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी दिली. त्यामुळे लवकरच या निविदा खुल्या करून अत्यंत तातडीने याची पुढील प्रक्रिया करून पात्र कंत्राटदारांची निवड केली जाईल. त्यामुळे शनिवारपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि प्रत्यक्षात १ एप्रिलपासून कामाला सुरुवात करून प्रत्यक्षात ४ ते ५ तारखेपासून पूर्ण क्षमतेने सफाईच्या कामाला सुरुवात होईल असा विश्वास बांगर यांनी व्यक्त केला.

मिठी नदीसोबत मोठ्या नाल्याच्या कामांसाठी परिमंडळ ५ निविदा मागवण्यात आली आहे. परंतु याला प्रतिसाद न लाभल्याने येत्या २७ मार्च पर्यंत निविदेला मुदतवाढ देण्यात आली आहे. तर परिमंडळ ३ आणि परिमंडळ ७मधील निविदा प्रक्रिया अंतिम झाली असून शुक्रवारपर्यंत कंत्राट मंजुरीचा प्रस्ताव सादर केला जाईल, असेही त्यांनी सांगितले

**छोट्या नाल्यांची सफाई एनजीओ कामगारांमार्फत**

महापालिकेच्या एस विभाग आणि एम पश्चिम विभागासाठी निविदेत कोणीही भाग न घेतल्यामुळे त्याठिकाणी खासगी स्वयंसेवी संस्थांच्या कामगारांची मदत घेवून तेथील गाळ काढण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

**मुंबईतील नालेसफाईचे काम २ टक्के**

मुंबईतील छोट्या, मोठ्या नाल्यांसाठी दोन वर्षासाठी कंत्राटदारांची निवड करण्यात आल्याने यावर्षी १ मार्चपासून कामाला सुरुवात होणे अपेक्षित होते. परंतु आतापर्यंत यासर्व नाल्यांमधील गाळाची सफाई ही केवळ २ टक्केच झाल्याची माहिती खुद्द अभिजित बांगर यांनी दिली. शहर भागात २.७४ टक्के, पूर्व उपनगरातील ४ टक्के आणि पश्चिम उपनगरातील ०.६३ टक्के नालेसफाईचे काम पूर्ण झाल्याची आकडेवारी बांगर यांनी यावेळी झालेल्या सादरीकरणादरम्यान दिली.

**सफाई झाली तरी वजन काट्यावरील मोजमापामुळे...**

मुंबईतील छोट्या, मोठ्या नाल्यांमधील गाळ काढण्याची टक्केवारी सरासरी दोन टक्के दिसत असले तरी ही आकडेवारी प्रत्यक्ष वजन काट्यावर मोजमाप झालेल्या गाळाची आहे. प्रत्यक्षात नाल्यातील गाळ काढल्यानंतर पुढील ४८ दिवसांमध्ये सुकवण्यासाठी ठेवला जातो आणि डंपरमधून वजन काट्यावर वजन करून नियोजित डम्पिंग ग्राऊंडवर टाकला जातो. त्यामुळे गाळ भरण्यापासून ते वजन करणे आणि पुढे डम्पिंग ग्राऊंडवर टाकेपर्यंत व्हिडीओ शुटींग करून जिओ टॅगिंग तसेच एआयच्या माध्यमातून यावर लक्ष ठेवले जाते. त्यामुळे प्रत्यक्षात नाल्यातून बराच गाळ काढलाल गेला असला तरी वजन काट्यावरील मोजमापानुसार सध्या सरासरी २ टक्के सफाई झाल्याचे दिसून येत आहे.

# कॉन्स्टेबल मुलीने अधिकारी वडिलांना मिल्कशेकमधून विष देऊन केलं ठार

## 3 वर्षांनी सत्य उघड... अख्खं पोलीस खातं हादरलं



■चंद्रपूर। प्रतिनिधी,

चंद्रपुरात मुलीनेच आपल्या पित्याची हत्या केल्याची घटना घडली आहे. चंद्रपूरमध्ये रक्ताच्या नात्यालाच मूठमाती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे कायद्याचे रक्षणकर्ते असलेल्याकडूनच हा प्रकार केला गेलाय. पोलीस असलेल्या प्रत्यक्ष जन्मदात्यालाच पोलीस कर्मचारी असलेल्या लेकीनं यमसदनी धाडलं आहे. यातून रक्ताच्या नात्याला तर कलंक लागलाच, सोबत खाकी वर्दीही डागाळली गेली आहे.

खाकी वर्दीतली आर्या बाल्लावार हिनं बॉयफ्रेंडशी लग्न करता यावं म्हणून जन्मदात्या बापालाच संपवलं आहे. आर्या बाल्लावार ही पोलीस दलात कॉन्स्टेबल म्हणून काम करते. आर्या तीन वषार्पूर्वी प्रशिक्षणार्थी पोलीस असलेल्या शेडमाके ह्याच्या प्रेमात पडली होती. आशिषशी आर्याला लग्न करायचं होतं. पण आर्याचे वडील आणि पोलीस कॉन्स्टेबल असलेले जयंत बाल्लावार यांचा या लग्नाला विरोध होता. प्रेमात आंधळी झालेल्या आर्याला काहीही करुन आशिषशी लग्न करायचं होतं. लग्नात अडथळा ठरणा-या जन्मदात्या बापाचा काटा काढण्याचा निर्णय आयार्नं घेतला.

25 एप्रिल 2023 रोजी जयंत बाल्लावार कामावर निघाले होते. कामावर जाताना आर्यानं वडिलांना मिल्क शेक बनवून दिल. मिल्कशेकमध्ये तिनं विष मिसळलं होतं. विषयुक्त मिल्कशेक पिऊन जयंत बाल्लावार जिल्हाधिकारी कार्यालयात ड्युटीवर गेले. विष शरीरात भिनल्यानं ते जमिनीवर कोसळले. जयंत बाल्लावार यांचा त्यातच मृत्यू झाला. त्यावेळी अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांचा मृत्यू झाला असं सर्वांना वाटलं. कोणालाही शंका न आल्याने फाईल बंद करण्यात आली.

वडिलांचा अडसर दूर झाल्यानंतर आर्यानं आशिष शेडमाके याच्याशी लग्न केलं. पण वडिलांचा रक्ताचा डाग लागलेलं लग्न फारकाळ टिकलं नाही. आशिष शेडमाके हा पोलीस ट्रेनिंगला असताना बेशिस्त वागू लागला. त्याच्या बेशिस्तीमुळं पोलीस दलानं त्याच्यावर बडतर्फीची कारवाई केली. पोलीस दलातली आशिषची नोकरी गेल्यानंतर आर्या आशिषच्या घरी गेलीच नाही. दोघांमधील वाद विकोलापाला गेला तेव्हा आशिषनं आर्याचं बिंग फोडण्याचा निर्णय घेतला. त्यानं पोलीस ठाणं गाठून आर्यानं वडिलांच्या केलेल्या खुनाची कहाणी सांगून टाकली.

पोलीसांनी अकस्मात मृत्यू म्हणून जयंत बाल्लावार यांच्या मृत्यूची नोंद केली होती. पण जयंत बाल्लावार यांचा मृत्यू हा आजारानं झाला नसून त्यांची हत्या केल्याचं तीन वर्षांनी स्पष्ट झालं.

आर्यानं वडिलांना मारण्यासाठी मावसभावाकडून 5 हजार रुपयांना विष खरेदी केलं होतं. शिवाय आशिष शेडमाकेहीची मदत घेतली होती. पोलिसांनी विष विक्रेता आणि आर्याच्या मावसभावाला अटक केलीय. प्रेमात आंधळी झालेली मुलगी वडिलांनाही मारायला मागंपुढं पाहणार नाही हे या निमित्तानं अधोरेखित झालं आहे.

# पासपोर्ट, टपाल कार्यालये बॉम्बने उडवण्याची धमकी

## राज्यातील प्रमुख शहरांमधील सुरक्षा यंत्रणा हायअलर्टवर

■बीड। प्रतिनिधी,

राज्यातील सर्व पासपोर्ट कार्यालये आणि टपाल कार्यालयांमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी देणारा एक निनावी संदेश बीड टपाल कार्यालयात धडकल्याने एकच खळबळजनक उडाली. कार्यालयात दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी आलेल्या ईमेलद्वारे ही धमकी देण्यात आली आहे. सायनॉइड विषारी वायू मिश्रित १६ आरडीएक्स बॉम्बचे स्फोट करण्यात येतील, असा इशारा या संदेशात देण्यात आला आहे. या धमकीवजा संदेशामुळे बीडसह राज्यातील प्रमुख शहरांमधील सुरक्षा यंत्रणांना हायअलर्टवर ठेवण्यात आले आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, स्वतःला 'कोयंबटूरचे मुसलमान' म्हणवून घेणाऱ्या एका अज्ञात गटाने




हा ई-मेल पाठवला आहे. या संदेशात अत्यंत प्रक्षोभक भाषेत धमक्या देण्यात आल्या आहेत. तामिळनाडूतील काही राजकीय घडामोडी, केंद्र सरकारची 'यूएपीए' अंतर्गत झालेली कारवाई आणि या प्रकरणांमध्ये माध्यमांनी अपेक्षित साथ न दिल्याने निर्माण झालेल्या रागातून हे पाऊल उचलल्याचा दावा या गटाने केला आहे. विशेष म्हणजे, हे स्फोट घडविण्यासाठी नक्षलवादी आणि 'आयएसआय' सेलची मदत घेतल्याचेही या ई-मेलमध्ये नमूद करण्यात आल्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

# 'तसले' व्हिडीओ पाहून 15 वर्षांचा मुलगा सैतान बनला

## 2 वर्षांच्या चिमुरडीवर केला अत्याचार

■बीड। प्रतिनिधी,

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. अवघ्या दोन वर्षे पाच महिने वयाच्या चिमुरडीवर तिच्याच 15 वर्षीय नातेवाईकाने लैंगिक अत्याचार केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे मोबाईलवर अश्लील व्हिडिओ पाहून आरोपीने हे कृत्य केले असून, पीडितेचा मृत्यू झाल्यानंतर शवविच्छेदन अहवालातून हा प्रकार उघड झाला आहे.

**चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्या दुचाकीवर बसवून नेले**

तपासादरम्यान पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले आणि त्यांच्या पथकाने अत्यंत गोपनीयरीत्या माहिती गोळा केली. पीडितेच्या मृत्यूनंतर संशयित आरोपी असलेला तिच्या आत्याचा मुलगा (वय 15 वर्षे 5 महिने) हा तीन दिवस जेवला नव्हता आणि सतत रडत होता, अशी माहिती पोलिसांना गुप्त बातमीदारांकडून मिळाली. या संशयावरून पोलिसांनी त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पीडितेच्या मृत्यूपूर्वी आठ दिवस अगोदर आरोपीने तिला चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्या दुचाकीवर बसवून नेले आणि घरात कोणी नसताना मोबाईलवरील अश्लील चित्रफीत पाहून तिच्यावर अत्याचार केले. त्यापूर्वी देखील त्याने तिच्यावर एक वेळेस अत्याचार केल्याची कबुली दिली.

या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 64 (1) आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) अधिनियम 2012 च्या कलम 4, 6, 8 आणि 12 नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी स्वतः सरकारतर्फे फियार्दी होऊन एका गुंतागुंतीच्या गुन्ह्याचा छडा लावला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पिंक पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधवर यांच्याकडे सोपवण्यात आला असून, या घटनेने संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**शवविच्छेदन केल्यानंतर मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे निदर्शनास आले**

अंबाजोगाई तालुक्यातील एका गावातील ही चिमुरडी 17 मार्च 2026 रोजी घरासमोरील पाण्याच्या हौदात पडून मयत झाली होती. सुरुवातीला हा केवळ अपघात वाटत असल्याने अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांनी शवविच्छेदन केल्यानंतर मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने सखोल तपास सुरू केला.




# मिरारोडमधील आगीत लाखोंचे नुकसान!



■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरारोडमधील प्लेझंट पार्क येथील आगीच्या घटनेसंदर्भात पालिका आयुक्त राधाबनोद शर्मा यांनी तात्काळ कारवाई करत त्याठिकाणी आगीवर नियंत्रण मिळविले आहे. मात्र यात आजूबाजूला असलेल्या सहा इमारतींमध्ये नुकसान झाले आहे. तर सदरील लागलेल्या आगीत प्राथमिकरित्या २० ते २५ घरांचे नुकसान झाले आहे. त्यात एकूण नागरिकांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. तर काही जणांचे घरातील सामान जळून खाक झाले आहे.

अग्निशमन विभागाने या अगोदरच कारवाई करण्यासाठी प्रभाग अधिकार्यांना पत्र लिहून कळवले होते. त्यावर सुद्धा काहीच कारवाई झालेली नव्हती, त्यामुळे ही आग लागली असल्याची तक्रारी आहेत. याप्रकरणी महापौर डिंपल मेहता यांनी पालिका आयुक्तांना निर्देश दिले आहेत. याशिवाय आगी संदर्भात २४ तासात खुलासा सादर करण्यासाठी प्रभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्तांना नोटीस दिली आहे. अन्यथा अशा अधिकार्यांना महासभेत आणून निलंबनाची कारवाई करणार असल्याचा इशारा महापौरांनी दिला आहे.

मिरा रोड येथील प्लेजंट पार्क परिसरात लागलेल्या भीषण आगीवर महापालिकेच्या अग्निशमन दलाने तब्बल सहा ते सात तासांच्या अथक प्रयत्नांनंतर नियंत्रण मिळवले. या घटनेत १००० नागरिकांना सुरक्षितरीत्या इमारतीबाहेर काढण्यात आले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. काशीमिरा परिसरातील कृष्णस्थळ येथे मोकळ्या जागेत अवैधपणे उभारलेल्या मंडप डेकोरेशन आणि फर्निचर गोदामाला मंगळवारी रात्री ९ च्या सुमारास आग लागली.

या आगीची अग्निशमन दलाला माहिती मिळाली. तत्काळ सिल्वर पार्क स्थानकाचे बंब रात्री घटनास्थळी दाखल झाले. आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे आणि आजूबाजूला निवासी इमारतींची दाट वस्ती असल्याने मोठा धोका निर्माण झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सिल्वर पार्कसह स्व. कल्पना चावला, कनकिया, नवघर आणि पेणकरपाडा या स्थानकांतील एकूण १० अग्निशमन वाहने आणि ५० हून अधिक जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर आग आटोक्यात आणण्यात आली.

# बायको कामावर गेल्यानंतर घरात सावत्र बापाचा लेकीवर अत्याचार

■बीड। प्रतिनिधी,

बायको कामावर गेल्यानंतर घरात सावत्र बापाने मुलीशी लज्जास्पद कृत्य केलं. नंतर 12 वर्षाच्या मुलीवर झालेल्या अत्याचाराची माहिती मिळताच, आईने पतीविरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी पीडितेची वैद्यकीय तपासणी करत आरोपी वडिलांना अटक केली, दरम्यान न्यायालयाने तुरुंगात पाठवले आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील बाराबांकीमध्ये घडल्याचे सांगण्यात येत आहे.

संबंधित प्रकरणात नवऱ्याच्या मृत्यूनंतर, चार मुलांच्या आईने जहांगीरबादमध्ये गावातील पुरुषाशी पुनर्विवाह केला. पती मजूर काम करताना महिला घरकाम करत होती. पतीच्या मृत्यूनंतर महिलेनं पुरुषाशी पुनर्विवाह केला आणि तिच्यासोबत चार मुलं देखील राहत होती. तीन दिवसांपूर्वी, महिलेनं पोलीस ठाण्यात तक्रार केली की, ती कामावर जाताना तिचा नवरा तिच्या 12 वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करायचा.

**अत्याचाराबाबत सांगितल्यास जीवे मारहण्याची धमकी**

दरम्यान, लैंगिक अत्याचाराबाबत कोणाला काही सांगितल्यास नंतर जीवे मारण्याची धमकी देखील दिली होती. एके दिवशी मुलगी अनपेक्षितपणे घरी आली असता, तिला आपल्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचं समजलं. 17 मार्च, रोजी आरोपी सावत्र वडिलांविरुद्ध पोक्सो अंतर्गत लैंगिक अत्याचारांच्या आरोपांसह गुन्हा दाखल केला. पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या प्रकरणात फरार आरोपीला पोलिसांनी 18 मार्च रोजी अटक केली होती.

# मुंबईत लेकीचा दफन केलेला मृतदेह पुन्हा बाहेर काढला अन् दीड वर्षांनी... बापाच्या एका संशयाने साकीनाका पोलिसही चक्रावले

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील साकीनाका परिसरातून एक थरारक आणि तितकाच धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आपल्या प्रेयसीसोबत राहण्याच्या हव्यासापोटी एका पतीने चक्क स्वतःच्या पत्नीच्या हत्येचा कट रचल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे सुरुवातीला अनेकांना हा प्रकार आत्महत्येचा वाटत होता. मात्र वडिलांच्या जिद्दीमुळे आणि दीड वर्षांच्या पाठपुराव्यानंतर हा हत्येचा कट असल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी साकीनाका पोलिसांनी पतीसह चार जणांना बेड्या ठोकल्या आहेत.

**नेमकी घटना काय ?**

१४ ऑक्टोबर २०२४ रोजी साकीनाका येथील संघर्ष नगरमध्ये राहणाऱ्या नारंगी उर्फ गीता चौधरी (३४) यांचा मृतदेह त्यांच्या घरातील स्वयंपाकघरातील पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला होता. सुरुवातीला पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून ही घटना आत्महत्या असल्याचे म्हटले. याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंदही करण्यात आली. यानंतर मृतदेहाचे मुंबईतील रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झाले नव्हते, ज्यामुळे हे प्रकरण बंद होण्याच्या मार्गावर होते.

**राजस्थानमधील 'री-पोस्ट मॉर्टम'**

यानंतर नारंगी यांचा मृतदेह




अंत्यसंस्कारासाठी त्यांच्या मूळ गावी राजस्थानला नेण्यात आला. मात्र, तिचे वडील भाना राम चौधरी (६६) यांना आपल्या मुलीने आत्महत्या केली, यावर विश्वास बसत नव्हता. त्यांनी हत्येचा संशय व्यक्त करत राजस्थानमध्ये तक्रार दाखल केली. वडिलांच्या अथक प्रयत्नांनंतर, दफन केलेला मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर राजस्थानमध्ये पुन्हा शवविच्छेदन करण्यात आले. या दुसऱ्या अहवालात नारंगी यांचा मृत्यू गळा दाबल्यामुळे झाल्याची धक्कादायक बाब समोर आली.

यानंतर मग वडिलांनी याप्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. यानंतर मुंबई पोलिसांच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली. आरोपी पती सकाराम चौधरी (३६) याचे डिंपल नावाच्या महिलेशी प्रेमसंबंध होते. त्याच्या प्रेमसंबंधात पत्नी अडथळा ठरत होती. पत्नीला वाटेतून दूर करण्यासाठी त्याने यापूर्वी दोनदा प्रयत्न केले होते. यासाठी त्याने एकदा बनावट रस्ते अपघात आणि दुसऱ्यांदा मारहाण करून तिला मारण्याचा प्रयत्न केला होता. मात्र हे दोन्हीही प्रयत्न फसले.

यानंतर अखेर त्याने आपल्या मित्राला शंकर डांगीला ६.७० लाख रुपयांची सुपारी दिली. यानंतर १४ ऑक्टोबर रोजी सकारामने दोन साथीदार बाबू गायरी आणि दिनेश गायरी यांच्या मदतीने पत्नीचा दोरीने गळा दाबून खून केला. यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह पंख्याला लटकवला. जेणेकरून तो आत्महत्येचा बनाव वाटेल.

**चार आरोपींना अटक**

यानंतर साकीनाका पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि संशयावरून सकारामची कसून चौकशी केली. तीनवेळा त्याने पोलिसांना गुंगारा दिला, मात्र चौथ्या फेरीच्या चौकशीत त्याने आपला गुन्हा कबूल केला. पोलिसांनी या प्रकरणात सकाराम चौधरी, शंकर डांगी, बाबू गायरी आणि दिनेश गायरी या चार आरोपींना अटक केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com